# ।। श्रीरामसमर्थ ।।

## श्रीसमर्थ वाग्देवता मंदिर, धुळे;
## संशोधन खण्डातील बाडांचा परीचय
## टाकळी मठ

**बाड १** **टांकळी मठ**

पृष्ठे : ५४६ आकार :२१× १३.२ (सेमी.)

ओळी :प्रतिपृष्ठ सरासरी २७ अक्षरे : प्रतिओळी सरासरी १३

भाषा : मराठी, हिदुस्थानी, संस्कृत लिपी : देवनागरी, मोठी

काल : सुमारे शके १६५५ लेखक :अनेक, अज्ञात

बाडात पाचशे अठ्याण्णव अभंग, दहा आरत्या, तीनशे अठ्याहत्तर ओव्या, एकशे-त्रेचाळीस मराठी व शेहेचाळीस हिंदुस्थानी मिळून ऐकशे एकोणनव्वद पदें, सहाशे-त्रेपन्न श्लोक आणि एक सवाई अशा एकूण अठराशेएकोणतीस रचना आहेत.

टीपा :

१) श्री. देवांची नोंद अशी की,बाडाची "पहिली आणि शेवटची काही पानें फाटून नष्ट झाली आहेत. ७० ते ३४२ इतकी पानें शाबूत आहेत. " आज उपलब्ध असलेल्या बाडात पान ७० फाटून गहाळ झालेले आहे आणि पान ७१ इतके फाटक्या अवस्थेत आहे की, त्यावरील लेखनाचा नीटसा अर्थबोध होत नाही. हयाशिवाय, ८६,९४, ९८,१०८,१०९,११०,१९७,२७४ व ३०३ हीं नऊ पाने गहाळ आहेत व पान ३२७ अर्धेच शिल्लक आहे.

२) पान ८६ गहाळ असल्यामुळे क्र. १७ हे पद अपूर्ण आहे. पान ९४ गहाळ असल्यामुळे क्र.पान २४ हे पद अपुर्ण आहे.पान ९८ गहाळ असल्यामुळे क्र.२९ च्या दोन श्लोकांपैकी दुसरा अपुर्ण आहे.पान ९९ वर जो आठ श्लोकांचा समुह आहे ते श्लोक १२ ते ९९ असे आहेत (क्र.३०). कदाचित, क्र २९ चे दोन श्लोक हयाच समूहातील असतील. (क्र.२९) व ३० मिळुन एक श्लोक समुह असेल) आणि त्यातील ३ ते ११ हे नऊ श्लोक पान ९८ बरोबर गहाळ असतील. १०८,१०९ आणि ११० गहाळ असल्यामुळे क्र ४० मधील काही अभंग गहाळ आहेत आणि क्र.४१ हया पदाच्या आरंभाचा काही भाग गहाळ आहे. हयाखेरीज त्या पानांवरील आणखी काही रचना असल्या पाहिजेत. पान १९७, २७४ व ३०३ गहाळ असल्यामुळे त्यांवरील कोणकोणत्या रचना गहाळ आहेत हे सांगता येत नाही. पान ३२७ अर्धे गहाळ असल्यामुळे क्र.३३८ हया दहा श्लोकांच्या गटातील ३ ते ८ हे सहा श्लोक गहाळ आहेत.

३) श्री.देवांनी म्हटल्याप्रमाणे, आरंभीच्या श्लोकांमध्ये आणि पदांमध्ये रामदासांनी रामायणकथा सांगितली आहे.(क्र. १ ते ४८), तशी नंतरच्या रचनांमध्ये (उदाहरणार्थ, क्र १३६, १४० ते १८० इत्यादी) रामायणकथा आहे. एका विशेष प्रकरणाचा श्री. देवांनी निर्देश कंला आहे.'' श्रीसमर्थकृत तत्वपदसंक्षेप (पृष्ठे ११७-१२७) म्हणुन पंचीकरणाचे प्रकरण आहे.'' हया तत्वपट प्रकरणामध्ये पंचीकरणाचा सिद्धांत समजणे सोपे जावे म्हणुन तक्ते केलेले असतात. असे तक्ते पान १२२ ते १२६ वर आहेत. (ते पान २८६ वर नसून २८४ ते २९७ ह्या पानांवर आहेत.) मात्र त्यांचा आरंभ श्लोक ४२ पासून झालेला दिसतो. पान २८४ वर श्लोक वर श्लोक ४१ ची अखेर आणि श्लोक ४२ पासूनचे श्लोक येतात. कदाचित, १ ते ४२ असलेंली, पान २८३ आणि २८४ ह्यांच्या दरम्यानची काहीं पानें गहाळ असतील ह्या त्रुटीचा उल्लेख श्री. देवांनी केलेला नाही. असे इतरत्रही झालेंले आढळते. उदाहरणार्थ, पान २९७ मा वर (क्र.३१८) सहा श्लोक पूर्ण असून सातव्याचा आरंभ झालेला दिसतो. तर पान २९८ वरील(क्र.३१९) पंधरा श्लोक हे खरोखर दुसऱ्या श्लोकाची अखेर ते सोळावा श्लोक असे आहेत. तेव्हा पान २९७ आणि २९८ ह्यांच्या दरम्यानचे (किमान ) एक पान गहाळ झालेले असावे. अशा त्रुटींचा उल्लेख श्री. देवांनी केलेला नाही. क्र. २३४ व ३३५ ह्या श्री. देवांनी उल्लेखिलेल्या, संसाराच्या ओव्या आणि क्र. ३३६ हीं रामायणांतील शतें आहेत. तशा क्र. ३३९ ह्या दासबोधातील ओव्या (मूर्खलक्षण) आहेत.

४) बांडातील, सुमारे, तीनशेचोवीस अंभग, आठ आरत्या, तीनशेऐकोणपन्नास ओव्या, एकशे एकतीस मराठी व चव्वेचाळीस हिंदुस्थानी मिळून एकशेपंचाहत्तर पदें, पाचशे दोन श्लोक, आणि एक सवाई एवढी रामदासांची रचना दिसते. ('सुमारे' असे म्हणण्याचे कारण :- अ) गणनेंत काही चूक झालेली असणें शक्य आहे. आ) काही रचनांचे कर्ते निश्चित करणें अवघड आहे, ३) काही रचनांचे (उदाहरणार्थ क्र. २० आणि क्र. २८९, क्र. २६३ आणि क्र. २६८, क्र, २२२ आणि क्र.२००) पुनर्लेखन झालेले आहे. त्यापैकी काही रचना प्रकाशित असल्या तरी श्री. देवांनी म्हटल्याप्रमाणे, '' या बाडात असलेल्या श्रीसमर्थांच्या अप्रकाशित कवितेर्ची छापील साठ पृष्ठें सहज भरतील.''

५) **बाडांत आलेल्या पंचवीस संस्कृत श्लोकांपैकी तीन श्लोक (क्र. २४६) प्रबोधचंद्रोदय ह्या (कृष्णचंद्राच्या) नाटकातील असल्याची नोंद बाडातच आहे. उरलेल्या श्लोकांचा संदर्भ नोंदवलेला नाही. क्र. ६३ हा मराठी श्लोक क्र. ६२ ह्या संस्कृत श्लोकाचा अनुवाद वाटतो.**

६) **पान ११३ जर सहा ओळी, पान १९२-मा वर चार ओळी, २६३-मा वर तीन ओळी. ३४२ मा वरस सात ओळी मजकूर आहे आणि पान २५२ वर एक यादी मोडीत आहे.**

---

**बाड २** **टांकळी मठ**

| | | | |
|---|---|---|---|
| पृष्ठें : | १६२ | आकार : | २१ ×१५.२ (सेमीं.) |
| ओळी : | प्रतिपृष्ठ सरासरी १३ | अक्षरे : | प्रतिओळी सरासरी १६ |
| भाषा : | गुजराती, हिदुस्थानी,मराठी | लिपी : | देवनागरी |
| काल : | सुमारे शके १७०५ | लेखक : | अनेक, अज्ञात |

बाडात नव्वद गुजराती, तीन हिंदुस्थानी व एक मराठी मिळून चौऱ्याण्णव पदें आहेत. गुजराती पदापैकीं बहुसंख्य पदें गरबागीतें आहेत. ३८,५३,८६ आणि ९२ या क्रमांकाशिवाय अन्य पदे गुजरातीत आहेत.

टीपाः-

१) श्री. देवांनी नोंद अशी आहेः ''हें सुमारें १२५ पृष्ठांने बाड संबंध गुजराती कवितेचे आहे. कविता गुजराथी, पण लिपी देवनागरी आहे. अक्षर सामान्य आहे. बाह्य स्वरूपात मोहकता मुळीच नाही. भाषा गुजराथी असल्यामुळे कवितेत काय गोडी आहे ती मला समजली नाही.''
अधिक नेमकेपणाने सांगायचे तर, बाडाची पृष्ठसंख्या एकशेबासष्ट आहे. बाड गुजराथी कवितेचे आहे. असे म्हणणे रास्तच आहे. तरी त्यात, अपवाद म्हणून तीन हिंदुस्थानी आणि एक मराठी पद (क्र. ५३,८६,९२ आणि ३८) आहे.

२) श्री. देवांनी म्हटले कीं, '' मळो गोविंद, नरसाई, प्रभुदास, रामईयो, आसाराम, काशीदास व दास मीठा ह्यांचे प्रत्येकी एकच पद आढळले. अनेक पदांचे कर्ते निश्चित सांगता येत नाहीत. वरील सात कवींखेरीज दास रत्नाकर, (क्र.४,९), द्वारकादास (क्र.४१,४२,४३) अशी **इतरही अनेक नांवे आढळतात.**

३) काही पदें (उदाहरणार्थ क्र. ४ पांडव तो निजधाम गया जो) हीं मराठी रचनांचे गुजराती अनुवाद असावेत असे वाटते.

---

**बाड ३** **टांकळी मठ**

| | | | |
|---|---|---|---|
| पृष्ठें : | १८२ | आकार : | १६.५ ×१२ (सेमीं.) |
| ओळी : | प्रतिपृष्ठ सरासरी १६ | अक्षरे : | प्रतिओळी सरासरी १४ |
| भाषा : | मराठी, हिदुस्थानी | लिपी : | देवनागरी |
| काल : | सुमारे शके | लेखक : | अनेक, अज्ञात |

बाडात दोनशेचौसष्ट मराठीव दोनशे सत्तेचाळीस हिंदुस्थानी मिळून पाचशेअकरा ओव्या, तीन मराठी व एक हिंदुस्थानी मिळून चार पदें, मराठी आणि अडुसष्ट हिदुस्थानी मिळून शहाऐंशी श्लोक, सत्तावीस हिंदुस्थानी साक्या, चोवीस दोहरे व दोन होरी आहेत.

---

**टीपा :-**

१) **'' सुमारे शंभर पानांचे'' असे श्री. देवांनी ह्या बाडाचे मोघम वर्णन केले आहे. बाडाची आरंभीची चार पानें कोरी असून पाचव्या पानापासून पृष्ठांना अनुक्रमांक दिलेले आहेत. ही चार पानें (म्हणजे आठ पृष्ठें) जमेस धरता, पृष्ठसंख्या एकशेब्याऐंशी भरते.**

**२) क्र. १ हे ''हिंदुस्थानी भाषेतील मछींदर आख्यान'' असून त्याची ''ओवीसंख्या'' ५८ ५८ आहे. क्र. ५ ते ११ हे हिंदुस्थानी (मराठी आणि संमिश्र ) भाषेतील 'गोपीचंद आख्यान' आहे. त्या आख्यानाच्या सात प्रसंगातील आरंभीच्या ओव्यांची /श्लोकांची संख्या अनुक्रमणिकेत नोंदली आहे. आख्यानात एकून १८९ ओव्या, २७ साक्या आणि ८६ श्लोक आहेत. ह्या ८६ श्लोकांपैकी ५७ हिंदुस्थानी, १८ मराठी आणि ११ संमिश्र आहेत.**

**३) क्र. १२ ते १५ हे कर्मविपाक अथवा हरिसंवादाचे चार अध्याय आहेत. एकून ओव्यांची संख्या २६४ आहे. श्री. देवांनी ''ओवीसंख्या २०५५'' असे म्हटले आहे. कर्मविपाकाचे आणखी काही अध्याय असून एकूण ओवी संख्या २०५८ आहे किंवा काय हे माहीत नाही.**

**४) १६५ ते १७४ क्रमांकांची पृष्ठे कोरी आहेत. पृ.१७४ वर ''मंगळवार ८ आष्टमी'' असे (आणि एवढेच) लिहलेले आहे. हा लेखनकालाचा त्रोटक उल्लेख आहे की काय हे सांगता येत नाही.**

---

**बाड ४** **टांकळी मठ**

पृष्ठे : १०२ आकार :४६.३ ×११.८ (सेमीं.)

ओळी :प्रतिपृष्ठ सरासरी २१ अक्षरे : प्रतिओळी सरासरी १५

भाषा : मराठी, संस्कृत,हिदुस्थानी लिपी : देवनागरी, मोडी

काल : सुमारे शके १६५० लेखक : अनेक, अज्ञात

बाडात पाचशेअकरा अभंग, नऊ ओव्या, दहा मराठी व चार हिंदुस्थानी मिळून चवदा पदें आणि पाच संस्कृत एक स्तोत्र आहे.

टीपाः तेव्हां श्री. देवांनी अपूर्ण म्हटलेल्या बाडाची आणखी काही पानें गहाळ झालेली दिसतात.

१) ''कागद ठिसूळ असल्यामुळे हें बाड अत्यंत जीर्ण झाले आहे. '' असे श्री. देव ह्यांनी त्या वेळी नोंदून ठेवले. बाड जितके हाताळले जाईल तितके त्याचे लहान लहान तुकडे निघत जातील.

२) क्र. ६ हे हरिपाठाचे अभंग आहेत. त्यांच्या सव्वीस गटांपैकी (किंवा सव्वीस अभंगापैकी ) एकोणीस ते तेवीस हे गट नाहीत. पृ. ९-१० हे पान अर्धेच शिल्लक आहे. ह्या अर्ध्या पानाबरोबर ते पाच गट गहाळ झाले असावेत.

३) प्रत्येक पानाचा वरचा आणि खालचा भाग कमी अधिक फाटलेला असल्याने कित्येक वेळी गहाळ आहेत. वाचता येत नाहीत. उदाहरणार्थ, हरिपाठाच्या अभंगाचे जे गट बाडात आहेत त्यातील अभंगाची ही संख्या ९६ आहे, परंतु, त्यातले सुमारे ७० अभंग सम्रग वाचता येतात. म्हणून, अनुक्रमणिकेत अभंगाची ही संख्या नोंदली आहे. तुकारामाच्या अभंगाची संख्याही (क्र.१५,३३) त्याच धोरणाने नोंदली आहे.

४) तुकारामाच्या अभंगांमध्ये ( क्र.३३) मधेच, पृ. २३ वर, 'शून्यामाजी शून्य त्याहिमाजी बीज ' हा गइनींच्या तीन अभंगांचा एक गट आलेला दिसतो. अनुक्रमणिकेत त्याची नोंद केलेली नाही.

५) वरील पृष्ठें (२७,२८,३०,४४,४६,५२,६० ते ६२, ६५ते ७०, ७६ते ९१, ९४ ते १०२ ) कोरी आहेत. पृ. ५३,५४ व ५८-५९ ह्यांवर मोडी मजकुर आहे.

६) पृ. ४३,४५,४७ ह्यांवर शकुन पाहण्याची एक रीत दिलेली आहे आणि पृ. ४८ ते ५१ मुहूर्त पाहण्याची रीत दिलेली आहे.

---

**बाड ५** **टांकळी मठ**

पृष्ठे : ७४ आकार :३७.५ ×१२.६ (सेमीं.)

ओळी :प्रतिपृष्ठ सरासरी २६ अक्षरे : प्रतिओळी सरासरी १५

भाषा : मराठी, संस्कृत लिपी : देवनागरी, मोडी

काल : सुमारे शके १७०५ लेखक :अनेक, अज्ञात

बाडात एक आरती, एकशेअठ्ठ्याहत्तर संस्कृत श्लोक आहेत.

टीपा : –

१) ''सुमारे ४६ पानांचे हें बाड होते. त्यांची आरंभींची ४ पानें च शेवटचें १ गहाळ आहे.'' अशी श्री. देवांची नोंद आहे. उपलब्ध बाडाच्या पहिल्या अनुक्रमांक पाच असला पाहिजे हे लेखकाने नंतरच्या पानांना दिलेल्या क्रमांकावरून म्हणाता येते. बाडाच्या एकोणचाळीसाव्या पानानंतर दोन पानें ती क्रमांक चाळीस व एकेचाळीसची असली पाहिजेच. म्हणजे बाडात क्रमांक पांच ते एकेचाळीस अशी सदतीस पानें आहेत.

२) क्र. १ ते ३ हे, श्री. देवांनी म्हटल्याप्रमाणें, विठ्ठलकृत जानकीस्वयंराचे तीन सर्ग आहेत. पहिल्या सर्गाचे २९ ते ६१ असे ३८ श्लोक आहेत. दुसऱ्या सर्गातील तेविसाव्या श्लोकाचे पहिले दोनच चरण आहेत. तिसऱ्या सर्गाचे १ ते २३ श्लोकच असून, त्यांपैकी अखेरचा तेविसावा श्लोक अपूर्ण आहे. पान १८ व १९ ह्यांच्या दरम्यानचे एक पान कापलेले दिसते.

३) क्र. ५ ते १८ ह्या जयदेवांच्या अष्टपद्या (२ ते ९ आणि २० ) आहेत. त्यापैंकी क्र. ९,११ व १३ ह्यांच्या संदर्भाची नोंद, अनुक्रमे, (गीतगोविंद) प्रथम सर्ग, द्वितीय सर्ग, तृतीय सर्ग केलेली दिसते. क्र. १९ ही एकादशी व्रतांची कथा अपूर्ण आहे.

---

**बाड ६** **टांकळी मठ**

पृष्ठें : २२ आकार :सुमारे ४० ×१६.५ (सेमीं.)

ओळी :प्रतिपृष्ठ सरासरी ३३ अक्षरे : प्रतिओळी सरासरी २०

भाषा : मराठी, संस्कृत लिपी : देवनागरी

काल : सुमारे शके १७०५ लेखक : अज्ञात

बाडात चार अभंग आणि दोनशेपंचवीस श्लोकांची गुरूगीता आणि अडुसष्ट श्लोकांचा ज्ञानतिलक मिळून दोनशेत्र्याण्णव संस्कृत श्लोक आहेत.

टीपा : –

क्र. १ हा 'ज्ञानतिलक' नावांचा ग्रंथ असून क्र. ३ ही 'गुरूगीता ' आहे. गुरूगीतेच्या अखेरी 'स्कंदपुराणे उत्तरखंडे ईश्वरपार्वतीसंवादे गुरूगीतास्तोत्रं ' अशी नोंद आहे.

---

**बाड ७** **टांकळी मठ**

पृष्ठें : ११४ आकार :सुमारे २७ ×१८.७ (सेमीं.)

ओळी :प्रतिपृष्ठ सरासरी २१ अक्षरे : प्रतिओळी सरासरी २०

भाषा : मराठी, संस्कृत लिपी : देवनागरी

काल : सुमारे शके १६५५ लेखक :अनेक, अज्ञात

बाडात एक आरती , चारशेएक्केचाळीस ओव्या आणि सदुसष्ट मराठी व पंधरा संस्कृत ब्याऐंशी श्लोक आहेत.

टीपा : –

१) श्री. देवांनी म्हटले आहे की, ‘‘सुमारे शंभर पृष्ठांचे हें बाड आहे. त्यांची पहिली २१ पृष्ठें फ ाटण्यात गेलीं आहेत.’’ ‘टाकळी बाड ७’ अशी नोंदीची चिठी लावलेल्या पहिल्या अतिशय जीर्ण पानाला बाडाच्या लेखाकाने अनुक्रमांक २२ दिलेला आहे, हे खरे.

परंतु बाडाच्या लेखकाने दिलेले अनुक्रमांक, निर्दोषपणे दिलेले नाहीत (उदाहरणार्थ, २२ नंतरच्या पानाचा अनुक्रमांक २४ आहे) आणि ५७ नंतर अनुक्रमांक दिलेलेच नाहीत.

नंतर कोणी लाल शाईने घातलेले अनुक्रमांकही निर्दोष नाहीत(उदाहरणार्थ, २२ नंतरच्या पानाचा अनुक्रमांक २४ आहे) आणि ५७ नंतर अनुक्रमांक दिलेलेच नाहीत.

नंतर कोणी लाल घातलेले अनुक्रमांकही निर्दोष नाहीत, (उदाहरणार्थ, पृ. ६ ला क्रमांक नाही. पृ. ७ ला क्रमांक ६ आहे; पृ. ला क्रमांक नाही).

पृष्ठांना पुन्हा एकदा अनुक्रमांक घालण्यापेक्षा दिलेल्या (लाल शाईतील) क्रमांकांचा निर्देश करणे सोपे वाटल्याने, अनुक्रमांक दिले आहेत.

२) श्री. देवांची नोंदल्याप्रमाणे, (क्र. १ व ३) एकनाथी भागवताचा काही भाग आहे. क्र. १ ह्या अठ्ठाविसाव्या अध्यायाच्या ४४ ते ८१ अशा अडतीस ओव्या आहेत. क्र. २ हे मनाच्या श्लोकांपैकी अठ्ठावन श्लोक आहेत. क्र. ६ संवत्सरांच्या नांवांची श्लोकबद्ध यादी आहे. क्र. ८ हे प्रल्हादचरित्र असून, त्यापूर्वी. बहुधा मंगल म्हणून, ‘गणाधीश जो ईश’ हा श्लोक (क्र.७) लिहिलेला आहे. क्र. ९ हे संस्कृत स्तोत्र अपूर्ण दिसते. कदाचित, नंतरचा भाग लिहिलेले पान फ ाटून गहाळ झाले असेल. क्र. १० मधील पाच ओव्यांपैकी आरंभीची आणि अखेरची अशा दोन ओव्या श्री. देवांनी उद्धृत केल्या आहेत. कर्त्याचा निर्देश केलेला नाही.

---

**बाड ८** **टांकळी मठ**

पृष्ठें : ११६ आकार :सुमारे १७.५ ×११ (सेमीं.)

ओळी :प्रतिपृष्ठ सरासरी १४ अक्षरे : प्रतिओळी सरासरी १२

भाषा : मराठी, हिंदुस्थानी लिपी : देवनागरी

काल : सुमारे शके १६०५ लेखक :अनेक, अज्ञात

बाडात तेरा मराठी व एक हिंदुस्थानी मिळून चौदा पदे आणि तीनशेपंचवीस श्लोक आहेत.

टीपा : –

१) ‘‘ह्या जीर्ण बाडांत सुमारें ६० पृष्ठें आहेत.’’ श्री. देव ह्यांनी म्हटले आहे. नेमकी पृष्ठसंख्या अठ्ठावन पानें (म्हणजे एकशेसोळा पृष्ठें) आहे. आरंभींचे किमान एकेक पान गहाळ आहे.

२) आरंभीं जे अनंतमेरूंचे पद आहे त्याच्या सुरूवातीच्या किती ओळी गहाळ पानावर होत्या हे सांगता येत नाही. श्री. देवांनी, ह्या पदाचा आरंभ येत नाही म्हणून अंत नोंदला आहे.

३) श्री. देवांनी म्हटल्याप्रमाणें, ‘‘ शाई उडून अक्षरें कमी अधिक पुसट झाली आहेत.’’ उदाहरणार्थ, रामदासांच्या सुंदरकांड आणि युद्धकांडांच्या शतापैकीं (क्र. ४,५,८) कित्येक श्लोक अस्पष्ट असून, काही श्लोक वाचणे दुर्घट आहे.

४) सत्तावनाच्या पानावर अनंतमेरूंच्या एका पदाचे चवथे आणि पाचवे अशीं दोन कडवी आहेत. (त्यातील अनेक अक्षरें पान फ ाटल्याने गहाळ आहेत) म्हणजे, आधीच्या तीन कडव्यांचें एक पान गहाळ असणे शक्य आहे.

---

**बाड ९** **टांकळी मठ**

पृष्ठें : २२६ आकार :सुमारे १६.४ ×८.४ (सेमीं.)

ओळी :प्रतिपृष्ठ सरासरी १४ अक्षरे : प्रतिओळी सरासरी १२

भाषा : मराठी लिपी : देवनागरी

काल : सुमारे शके १६०५ लेखक :कोणी अज्ञात

बाडात आठशेंपंचाण्णव श्लोक आहेत.

टीपा : -

१) श्री.देव ह्यांनी बाडाची पृष्ठसंख्या दिलेली नाही. बाडाच्या आरंभीचीं व अखेरची काही पानें गहाळ आहेत. बाडात रामदासांच्या युद्धकांडाची दोन ते अकरा अशीं दहा शतें आहेत. त्यापैकीं, दुसऱ्या शताचे फक्त चव्वेचाळीस श्लोक आहेत. बाडाच्या उपलब्ध एकशेचौदा पानांपैकी एकशेचौदावे, म्हणजे अखेरचे पान फाटून त्याचा तुकडाच उरलेला असल्याने पृष्ठांच्या गणनेत ते जमेस धरले नाही.

श्री. देवांच्या मते, '' हे तत्कालीन बाड आहे. तें कदाचित उद्धवाच्या हातचेंहि असेल.'' बाडाचे हस्ताक्षर उद्धवाचे आहे किंवा नाहीं हें जाणकारांनी ठरवावे. तोवर, लेखक कोणी अज्ञात आहे असे म्हणावे लागेल.

२) मात्र, बाडांचे हस्ताक्षर सुरेख म्हणण्यासारखे आहे आणि लेखन सर्वस्वी निर्दोष नसले तरी प्रमाणबद्ध, नेटके असून, अखेरपर्यंत अक्षर एकसारखे आहे.

---

## बाड १० टांकळी मठ

पृष्ठें : १५२ आकार : सुमारे १३.८ ×१०.७ व १३.४ ×१०.३ (सेमी.)

ओळी : प्रतिपृष्ठ सरासरी १४ अक्षरे : प्रतिओळी सरासरी ११

भाषा : मराठी,संस्कृत, हिंदुस्थानी,गुजराती लिपी : देवनागरी,मोडी.

काल : सुमारे शके १७०५ लेखक : अनेक अज्ञात

बाडात दोनशेएकोणसत्तर अभंग, चौपन ओव्या, शेहेचाळीस मराठी, चौदा हिंदुस्थानी व एक गुजराती मिळून एकसष्ठ पदे, एक शेर, दोन दोहरे, आणि दोन मराठी व चार संस्कृत मिळून सहा श्लोक आहेत.

श्री.देव ह्यांनी बाडाची पृष्ठसंख्या दिलेली नाही. बाडाच्या आरंभीचीं व अखेरची काही श्लोक आहेत.

टीपा : -

१) श्री.देव हयांनी म्हटले की, ''ही दोन लहान बाडं एकत्र शिवलेली आहेत. एक बावीस पानांचे बाड आहे व त्यांच्या पोटांत मधोमध दुसरे साठ पानांचे आहे.'' म्हणजे ब्याऐंशी पानें (किंवा १६४ पृष्ठे) असायला हवीत परंतु पृ. १३० नंतरची सहा पाने कापल्यासारखी दिसतात. ती फाटून गहाळ झाली असावीत. म्हणजे आता शहात्तर पाने (किंवा १५२ पृष्ठे तेवढी उपलब्ध आहेत.)

२) पृष्ठांच्या अनुक्रमांकांच्या बाबतींतही काही घोटाळा दिसतो. श्री.देव हयांच्या नोंदीप्रमाणे, दामाजीपंतांची रस्त पान ४ वर अंबरनाथांचे एक पद पान ३० वर आणि समर्थांची तीन पदे, अनुक्रमे, पान १३, १४ व २४ वर हवीत. परंतु, दामाजीपंताची रस्त (क्र २४) पृ. ३१ ते ३५ वर, अंबरनाथांचे पद (क्र.८०) पृ. ८२ ते ८६ आणि समर्थांची तीन पदे, (क्र. ३९,४०,व ६८), ही, अनुक्रमे, पृ.४९-५०, पृ.५० पृ. ७०-७१ वर आहेत.

३) पहिले मानलेले पाम त्यांच्या आकारमानावरुन पोटातील लहान बाडाचे असावे असे वाटते.

४) पृ.१३२ ते १३८ मोडीत लिहिलेले एक पत्र आहे.

**बाड ११** **टांकळी मठ**

पृष्ठें : ३९४ आकार : सुमारे १०.४ ×९.६ (सेमीं.)

ओळी : प्रतिपृष्ठ सरासरी १४ अक्षरे : प्रतिओळी सरासरी १२

भाषा : मराठी,संस्कृत, लिपी : देवनागरी

काल : सुमारे शके १६५५ लेखक : अनेक अज्ञात

बाडात आठशेएक ओव्या. दोनशेएकोणऐंशी मराठी व बेचाळीस संस्कृत मिळून तीनशेएकवीस श्लोक आहेत.

टीपाः

१) बाडाच्या अनेक लेखकापैंकी ज्याने पानांना अनुक्रमांक देताना १६८ हा अखेरचा क्रमांक दिला आहे. त्याच्यावर, बहुधा, विसंबून श्री.देव ह्यांनी म्हटले की, “ बाडांत १६८ पृष्ठें आहेत.” वस्तुताः अनुक्रमांक न दिलेली पान सदतीस नंतरची तीन पानें आणि एकशेअडुसष्टनंतरची दोन पानें जमेस धरता, बाडांत एकशेसत्याण्णव पानें (म्हणजे तीनशेचौऱ्याण्णव पृष्ठें) आहेत. त्यापैंकी काही पृष्ठें कोरी आहेत.

२) बहुधा, बाडाला शिवण घालताना क्र. १९ (रघुनाथध्यान) ची बारा पानें क्र. ३० (पंचसमासीचा पहिला समास ) नंतरच्या, ४४ ते ११८ ह्या ओव्यांपैकी पहिल्या त्रेचाळीस ओव्या पृष्ठ १०५ मा ते पृ. ११२ मा ह्या पृष्ठावर, तर नंतरच्या, ४४ ते ११८ ह्या ओव्या पृ. १५९ ते पृ. १७० मा ह्या पृष्ठांवर आहेत. त्याचप्रमाणे, क्र. ३१ च्या पहिल्या ओवीचा आरंभ पृ. १५८ मा वर आहे आणि ती पृ. १७१ वर पूर्ण होते.

**३)** क्र. ४१ हे बारा ओव्यांचे प्रकरण छापून प्रसिद्ध केलेले आहे. (श्रीसां वि. वि. खंड दुसरा, लेख ८२ ) क्र. २ व ३ ह्या पंचीकरणावरील ओव्या आहेत. क्र. ४ हा जुन्या दासबोधातील रघुनाथध्यानाचा पंधरावा समास आहे. क्र. ६ भगवद्गीतेच्या बारावा अध्यायाचे वीस व (गीतास्तवनाचे दोन ) श्लोक आणि तुकारामाच्या चौऱ्यांऐंशी ओव्यांमध्ये केलेला त्यांचा अनुवाद, क्र. ६ भगवद्रीतेच्या पंधराव्या अध्यायाचे वीस श्लोक आणि पार्वतीसारथी वामनांनी केलेला समश्लोकी अनुवाद, क्र. ७ ते ११ ‘आत्मारामाचे ’ पाच समास, क्र. १२ ते १७ ‘अंतर्भाव ’ चे सहा समास, क्र. १८ पूर्वारंभ, क्र. ३० ते ३४ पंचसमसी, ह्या रामदासांच्या रचना आहेत.

**बाड १२** **टांकळी मठ**

पृष्ठें : ११२ आकार : सुमारे १३ ×१०.६ (सेमीं.)

ओळी : प्रतिपृष्ठ सरासरी ८ अक्षरे : प्रतिओळी सरासरी १३

भाषा : मराठी लिपी : देवनागरी, मोडी.

काल : सुमारे शके १७१० लेखक : अनेक, अज्ञात

बाडात दोनशे एकवीस अभंग, चार ओव्या, अकरा पदें ,. दोनशेएकोणऐंशी मराठी व बेचाळीस संस्कृत मिळून तीनशेएकवीस श्लोक आहेत.

टीपाः

१) श्री.देवांची नोंद अशीः “ हे सरासरी ६० पृष्ठांचे बाड आहे. अक्षर वाईट आहे. ते कोणी मुलाने किंवा अशिक्षितानें लिहिलेलें दिसतें.
याच्यावर पानाचे अंक मुसलमानपद्धतीप्रमाणें उलटया बाजूनें घातलेले आहेत.”

बाडाच्या पानांना नंतर कोणी अनुक्रमांक घातलेले दिसतात. ह्यात थोडा घोटाळा झालेला दिसतो. त्या पानाला क्रमांक ३ दिला आहे ते बाडाचे पहिले पान असावे. (त्यानुसार , त्या पानावर ‘‘ टांकळी मठ १२ ’’ असे लिहिलेली चिठ्ठीही लावलेली दिसते.) श्री. देवांनी म्हटलेल्या ‘मुसलमानपद्धतीप्रमाणे ’ ह्या पानाला क्रमांक ५६ दिलेला आहे.

शुकरंभासंवाद (क्र.६७) ह्या रचनेची एक ते सहा कडवी ५५ आणि ५६ हे क्रमांक दिलेल्या पानावर असून, त्या रचनेची सात ते दहा ही कडवी पान १ वर आहेत. तेव्हा नव्याने दिलेल्या क्रमांकाप्रमाणे, पान क्र.१ व २ ही पानें बाडाची अखेरची पानें असावीत.

बाडाची ५५ पानें उपलब्ध आहेत. कदाचित अखेरची दोन पानें गहाळ असतील तसे असेल तर, मूळ बाड ५७ पानांचे होते असे म्हणता येईल. (एकाच पानाला ५१ व ५२ असे दोन क्रमांक दिल्याने अखेरचे पान ५६ आहे.)

२) पृ. १९,२४,२७,२९ अशा अनेक ठिकाणी थोडे थोडे मोडी लेखन दिसते, तर पृ. ५ मा, ३७ मा, ४९ मा अशा काही ठिकाणी हिशोबाच्या नोंदी मोडीत दिसतात. अनेक ठिकाणी (उदा. पृ. ४४मा) नुसत्या रेघोटया किंवा लेखन सराव (उदा. पृ. १४,१८,२२) दिसतो. पृ.३ मा, ४ मा , ६ मा, २३ व ३८ मा कोरी आहेत. ‘‘बाड अति अशुद्ध, बहुधा निरूपयोगी ’’ असा श्री. देवांचा निष्कर्ष आहे.

---

## बाड १३ टांकळी मठ

ह्या बाडासंबंधीची श्री. देव हयांची नोंद अशीः

‘‘या अगदी चिमुकल्या बाडात आरंभी तत्कालीन ’’ (सुमारे शके १६०५) कोणा अभ्यासकाने ‘अनाभ्यासि नामाचा संकेत’म्हणून ब्रह्माची १२५ नावे उतरली आहेत व नंतर द्विपुटीची ४२ उदाहरणे, त्रिपुटीची २५ उदाहरणे, चौपटीची ३० उदाहरणे, पंचपुटींची ६, सप्तपुटीची १५, अष्टपुटींची १५, नवपुटीची ८, द्वादशपुटीचीं २, अशी उदाहरणें दिली आहेतः अक्रापुटी शब्द लिहून खाली उदाहरण न देतां जागा कोरी सोडली आहेः नंतर द्वादशपुटीची दोन उदाहरणे, चतुर्दशपुटींचे एक उदाहरण व शेवटी षोडश पदार्थांची नांवे सांगून

बहुत कागदीं असे । परंतु पाठ तें नसे ।
प्रसंगमान माहिती । समीप वैखरी रिती ।।

या श्लोकाने बाड संपविले आहे. ’’

हें बाड गहाळ आहे.

---

## बाड १४ टांकळी मठ

सुमारे : १३-२ सेंमी, रूंद, (कागदाला कागद चिकटवून केलेले)

ओळी : प्रतिपृष्ठ सरासरी ८ अक्षरे : प्रतिओळी सरासरी १४

भाषा : मराठी लिपी : देवनागरी

काल : सुमारे शके १७१० लेखक : अनेक, अज्ञात

बाडात बहेरूंचे तीनशेबारा अभंग (किंवा बाडाच्या लेखकांनी नोंदल्याप्रमाणें, दोनशेबावीस अभंग आणि नव्वद ओव्या ) आहेत.

१) कागदाच्या वेटाळयांत कमी - अधिक लांबीचे सोळा कागद एकास एक चिकटविलेले दिसतात.
२) क्र. २४ ते ३६ ह्यांना बाडाच्या लेखकाने ओव्या म्हटलेले असले तरी ते अभंगच आहेत.
३) ह्या अभंगांची पार्श्वभूमी श्री. देव ह्यांनी सांगितली आहे की, ‘‘बहेरू, यांचा एकुलता एक मुलगा वारला, त्या दुःखाच्या भरांत कांही उद्वेगाचे, कांही संतापाचे त्यांनी हे अभंग केले.’’ बाडाच्या लेखकाने क्र.११ ला ‘अभंग संतापाचे ’ असे शीर्षक दिले आहे.
४) अभंगांची (म्हणजे अभंगगटाची) संख्या श्री.देव हयांनी ४३ म्हटली आहे. परंतु वेटाळयांतील कागदांच्या एका बाजूस क्र. १ ते ३७ हे अभंग आहेत ते ३८ ते ४४.

---

## बाड १५ टांकळी मठ

पृष्ठे : २६ आकार : सुमारे ३०.४ ×२९.६ (सेमीं.)

भाषा : मराठी, संस्कृत लिपी : देवनागरी, मोडी.

काल : शके १७२६ लेखक : ज्ञानदेवदास (?)

बाडात एकसंस्कृत श्लोक (मंगल), पाच ओव्या आणि बरेच तक्ते आहेत.

१)श्लोक १ सं. आदिनाथ मच्छिंद्र गोरक्षत्रयनिस्तथा । १मा

२)ओव्या ५ तूचि सदाशिव ईश्वरू । रूद्र विष्णकुमरू। १मा

टीपाः

१) ''संबंध कागदाच्या आकाराचे बारा पृष्ठांचे म्हणजे बाराच कागदांचे हे बाड आहे. ङ्घश्री. देव ही गणना केलेली दिसत नाही. मुखपृष्ठांवर तेरा पाने, म्हणजे सव्वीस पृष्ठे आहेत.
२) मुखपृष्ठानंतरचे एक पृष्ठ, पान एकची एक बाजू, कोरे आहे. पान अकराच्या दोन्ही बाजू कोऱ्या आहेत पान बारावर, आधी दिलेल्या तक्त्यापैकी एका तक्त्याचे अंशतः पुनर्लेखन आहे. हया पानाच्या मागील बाजू वर मोडीत कसलीशी यादी दिसते.
३) पंचीकरण हया विषयाची मांडणी करणारे तक्ते, म्हणजे 'तत्वपट' पान दहावर पूर्ण झालेला असुन, तेथे हा ज्ञानदेवदासाचा तत्वपट लिहिल्याचा काल (श्री. देव हयांनी नोंदल्याप्रमाणे ) ''शके १७२६ रक्ताक्षिनाम संवत्सरे....''इ. दिला आहे.
४) बाड घडया करून ठेवलेले आहे आणि श्री. देव हयांनी म्हटल्याप्रमाणे, 'घडीच्या जागी काही अक्षरें फाटण्यात आली आहेत.

**बाड १६** **टांकळी मठ**

पृष्ठे : ३६ आकार : सुमारे १९.५ ×१२.४ (सेमीं.)

ओळी : प्रतिपृष्ठ सरासरी १२ अक्षरे : प्रतिओळी सरासरी २४

भाषा : मराठी, लिपी : देवनागरी

काल : सुमारे शके १७०५ लेखक : अज्ञात

टीपाः

१) श्री. देव ह्यांनी म्हटल्याप्रमाणे, ज्ञानेश्वरीतील ''शब्दापर्या'' या बाडात आहे. शब्दपर्या=शब्द पर्याय. यांत अकार विल्हेने ज्ञानेश्वरौतील कठीण शब्द व त्यांचे अर्थ दिलेले आहेत.
२) ह्या शब्दकोशाची रचना कोणी केली त्याची नोंद नाही. कोशात एकूण पाचशेसत्याहत्तर शब्दांचे अर्थ दिलेले आहेत.
३) पहील्या पानाच्या मागील बाजूस क्रमांक १ देऊन पृष्ठांना ३३ पर्यंत क्रमांक दिलेले आहेत.
४) पृ. २० वर शब्दकोशाची अखेर आहे. त्यानंतरची पृष्ठें कोरी आहेत.

**बाड १७** **टांकळी मठ**

पृष्ठे : ४० आकार : सुमारे २७.२ ×१५.२ (सेमीं.)

ओळी : प्रतिपृष्ठ सरासरी १३ अक्षरे : प्रतिओळी सरासरी १२

भाषा : मराठी,हिदुस्थानी लिपी : देवनागरी

काल : सुमारे शके १७५५ लेखक : अज्ञात

बाडात रामदासांचे आठ्ठयाण्णव मराठी व चार हिंदुस्थानी मिळून एकशेदोन अभंग आहेत.

टीपाः

१) श्री. देव ह्यांनी म्हटल्याप्रमाणे, “ हे दहा वीस पानांचे अगदीं किरकोळ बाड आहे.” म्हणजे बाडात वीस पानें (चाळीस पृष्ठें) असली तरी अभंगांचे लेखन पानांच्या एकाच बाजूवर केलेले दिसते. पानांच्या (उदा. पान ३,१०,१७) मागील बाजूला देवनागरीबरोबर मोडी लिपीत काही लेखन केलेले दिसते. बाकीच्या पानांच्या मागील बाजूस कोऱ्या आहेत.
२) क्र. १३ ‘चापबाण काय केले’ आणि क्र. २१ ‘उठ चल सब सोबती रे’ ही पदें असणे शक्य आहे.
३) ‘टांकळी बाड १७ ’ अशी नोंदीची, चिठी पहिल्या पानाऐवजी अखेरच्या पानावर लावलेली आहे.
४) बाडाची आरंभीची व अखेरची काही पानें
५) ह्या बाडातील काही अभंग अप्रकाशित आहेत, असे श्री. देव ह्यांनी म्हटले आहे. हे अप्रकाशित अभंग कोणते ते तज्ञांनी ठरवावयाचे आहे.

## बाड १८ टांकळी मठ

टीपाः

ह्या बाडांतील श्री. देव ह्यांची नोंद अशी :
“ ही मुक्तेश्वरकृत हनुमंत नाटकाची पोथी होती. ओवीसंख्या १३४. लेखनकाल १६९२ श्रावण वद्य ३० हस्ताक्षर सिवजी माधजी प्रभु कायेस्त न्याती माहिमकर .

कै. नारायणराव केळकर हे काव्यसंग्रह संपादित असतां त्यांनी ही प्रत मागून घेतली होती, पण पुढे ते निवर्तल्यामुळे ती प्रत परत आली नाहीं

या अनुक्रमाकाचे जागी अर्थात संग्रहात ही पोथी नाहीं.

हे प्रकरण काव्येतिहास संग्रहांतील अनेक कविकृत पहिल्या भागांत छापलेले आहे.”

---

## बाड १९ टांकळी मठ

पृष्ठें : १४ आकार : सुमारे २५.५ × १४.६ (सेमीं.)

ओळी : प्रतिपृष्ठ सरासरी १२ अक्षरे : प्रतिओळी सरासरी २४

भाषा : मराठी लिपी : देवनागरी

काल : सुमारे शके १७०५ लेखक : अज्ञात

टीपाः

श्री. देव ह्यांनी म्हटल्याप्रमाणे, “ ज्ञानेश्वरीशब्दपर्येची ही दुसरी प्रत... (बाड) अनुक्रमांक १६ पेक्षा ही जास्त सुंदर आहे. ” म्हणजे ह्या प्रतीचे हस्ताक्षर चांगले आहे.

परंतु दोन प्रतीमधील शब्दसंख्येमध्ये फ रक दिसतो. सोळाव्या शतकातील संख्या पांचशेसत्याहत्तर आहे. तर एकोणिसाव्या बाडात पाचशेपंचाहत्तर आहे.

---

## बाड २० टांकळी मठ

पृष्ठें : ४ आकार : सुमारे २५.५ X १४.६ (सेमीं.)

ओळी : प्रतिपृष्ठ सरासरी १० अक्षरे : प्रतिओळी सरासरी २८

भाषा : मराठी लिपी : देवनागरी

काल : सुमारे शके १७०५ लेखक : अज्ञात

बाडात पंचवीस ओव्या आणि काही गद्य मजकुर आहे.

ओव्या २५ आतां वदुं गजानन । माते शारदेसी नमन १-४

टीपाः

हे दासबोध ओवीबद्ध 'मुखवस्त्र' आहे. 'मुखवस्त्र' म्हणजे विषयानुक्रमणिका अथवा विषयसूची होय – बाडात म्हटल्याप्रमाणे, " कोणे दशर्कि कोणे समासी काय बोलले याचा विचार, "

पंचवीस ओव्यानंतर, परिशिष्टासारखी, गद्य पुरवणी पृ. चारवर आहे. ह्या पंचवीस ओव्या श्री. देव ह्यांनी उद्धृत केलेल्या आहेत.

## बाड २१ टांकळी मठ

पृष्ठें : ११४ आकार : सुमारे २२.७ X १४.८ (सेमीं.)

ओळी : प्रतिपृष्ठ सरासरी १३ अक्षरे : प्रतिओळी सरासरी २६

भाषा : मराठी लिपी : देवनागरी

काल : सुमारे शके १७८० लेखक : अज्ञात

बाडात तेरा अभंग . एक आर्या आणि एक हजार एक्याण्णव ओव्या आहेत

टीपा :

१) श्री. देवांनी नोंद अशी " श्रीहनुमंतस्वामीकृत बखरीला अनुसरून कोणी हें ओवीबद्ध श्रीसमर्थचरित्र लिहिलेलें आहे. त्यांत चाफळमठाच्या स्थापनेपर्यंतचा कथाभाग आला आहे.
२) क्र. १ व २ मिळून पहिला अध्याय, क्र. ३ ते ७ हे, अनुक्रमे, अध्याय दोन ते सहा, क्र. ८ व ९ मिळून अध्याय ७, क्र. १० व ११ हे, क्रमाने, अध्याय आठ व नऊ आहेत. क्र. १२ ह्या दहाच्या अध्यायाच्या एक्याण्णव ओव्यानंतर लेखन थांबविलेले दिसते.
३) पृ. १९,२०,२१,२२,४३,४४ ही कोरी आहेत. (म्हणजे पानाच्या एकाच बाजूवर लिहिलेले आहे. पान ७७ (अखेरचे पान) कोरे आहे.
४) बाडाच्या अज्ञात लेखकाने (किंवा, कदाचित, अनेक लेखकांपैकी एका लेखकाचे) अक्षर कित्यासारखे आहे. विशेषतः पृ. १,२,६,९, इ. पहावीत.

## बाड २२ टांकळी मठ

पृष्ठें : ३२ आकार : सुमारे १९.५ X १६.४ (सेमीं.)

ओळी : प्रतिपृष्ठ सरासरी १६ अक्षरे : प्रतिओळी सरासरी १४

भाषा : मराठी लिपी : देवनागरी

काल : सुमारे शके १७०५ लेखक : अज्ञात

बाडात दोनशे सत्तर अभंग आणि एक पद आहे.

टीपाः

१) श्री. देवांनी नोंदीप्रमाणे " पहिलें पान गहाळ आहे." उपलब्ध बाडात पहिले पान फाटून अर्धे गहाळ झालेंले दिसते. तसे पान १५ फाटून अर्धे गहाळ आहे आणि पान १७ चा सुमारे १/३ तुकडा आहे. ह्या अतिशय जीर्ण बाडाच्या अनेक पानांना कसरीने भोंकें पाडलेली दिसतात. त्यामुळे त्या त्या ठिकाणचे शब्द वाचणें अवघड होते- काही ठिकाणी अशक्यप्राय होते. अशा अभंगाची नोंद अनुक्रमणिकेत नाही. उदाहरणार्थ १,१४,१५,१६,१७ ह्या पानावरील अनेक अभंग.

२) श्री. देवांनी नोंदीप्रमाणे, बाडात " रामदास, मध्वनाथ, बहेणी ... यांचे अभंग आहेत." ह्यापैकी मध्वनाथांची रचना अभंग नसून पद आहे असे वाटते.

## बाड २३ टांकळी मठ

पृष्ठें : १४ आकार : सुमारे २०.५ × १०.२ (सेमीं.)

ओळी : प्रतिपृष्ठ सरासरी ७ अक्षरे : प्रतिओळी सरासरी २१

भाषा : मराठी, संस्कृत लिपी : देवनागरी

काल : सुमारे शके १६५५ लेखक : अज्ञात

बाडात चार संस्कृत श्लोक आणि सत्तेचाळीस ओव्या आहेत.

टीपाः

१) श्री. देवांनी म्हटल्याप्रमाणे , ही नित्यानंदविरचित निरंजनाष्टकाची, पोथी आहे. पहिली पाच गहाळ आहेत. आठ संस्कृत श्लोकांवर सत्याहत्तर ओव्यांची टीका, अशा रचनापैंकी एकतिसाव्या ओवीचा अंश आणि पुढील शेहेचाळीस ओव्या व चार संस्कृत श्लोक उपलब्ध बाडात आहेत. प्रत्येक श्लोकाचा अखेरचा चरण 'तस्मै नमोगब्रह्मनिरंजनाथ ' असा आहे.

## बाड २४ टांकळी मठ

पृष्ठें : २० आकार : सुमारे २०.२ × १०.१ (सेमीं.)

ओळी : प्रतिपृष्ठ सरासरी ७ अक्षरे : प्रतिओळी सरासरी २२

भाषा : मराठी लिपी : देवनागरी

काल : सुमारे शके १६५५ लेखक : अज्ञात

बाडात ऐंशी ओव्या आहे.

टीपाः

१) श्री. देवांनी म्हटल्याप्रमाणे , हे बाड म्हणजे " ज्ञानदेवविरचित अमृतानुभवाच्या पोथीची २५ ते ३४ पानें आहेत. यांत चवथ्या प्रकरणाच्या शेवटापर्यंत भाग आला आहे ."

**बाड २५** **टांकळी मठ**

पृष्ठें : २०२ आकार : सुमारे २७ × १४.४ (सेमी.)

ओळी : प्रतिपृष्ठ सरासरी १७ अक्षरे : प्रतिओळी सरासरी ४४

भाषा : मराठी लिपी : देवनागरी

काल : सुमारे शके १७५५ लेखक : अज्ञात

बाडात हनुमंतस्वामीच्या बखरीची १,२,३,४ व १३ अशी पाच प्रकरणें आणि महिपतीच्या ओवीबद्ध 'दासविजयाचा' अध्याय एक व दोन एवढे दोनच अध्याय आहेत. ह्या दोन अध्यायात एक अभंग, तीनशेब्याण्णव ओव्या आणि नव्वद श्लोक आहेत.

टीपाः

१) दोन स्वतंत्र ग्रंथाची एकत्र टांचलेली हस्तलिखितें असे हे बाड आहे. पहिल्या ऐंशी पानांत हनुमंतस्वामीच्या बखरीचीं प्रकरणें आणि नंतरच्या एकोणीस पानांत दासविजयाचे अध्याय अशी नव्याण्णव पानें आणि आरंभी कोरीं सोडलेली दोन पानें मिळून एकशेएक पानें (म्हणजे दोनशे दोन पृष्ठें ) आहेत.
२) आरंभीच्या दोन पानांखेरीज, पहिल्या ऐंशी पानंमध्ये १४ मा. १५, २४ मा , २५, ३६ मा, ३७,६२ मा, ६३,८०,८०मा, ही पृष्ठें कोरी आहेत. तशी , नंतरच्या एकोणीस पानांमध्ये , १,१० मा १९ मा हीं पृष्ठें कोरी आहेत.
३) दासविजयाच्या दुसऱ्या अध्यायात एकशेशहाऐंशी ओव्यांबरोबर एक अभंग आणि नव्वद श्लोक आहेत, अनुक्रमणिकेत अभंग आणि श्लोक ह्यांची स्वतंत्र नोद केलेली नाही.
४) बखरीतील माहितीवरून श्री. देवांनी असा निष्कर्ष काढला आहे की, '' हनुमंतस्वामीनी लिहिलेली बखर त्रोटक होती. तिची १७१५ तील एक प्रत घेऊन मल्हार रामराव चिटणीस व रंगो लक्ष्मण यांनी १७३९ त तिचा विस्तार केला. हल्ली प्रकाशित असलेली बखर ती ही विस्तार पावलेली बखर होय.''
५) श्री. देवांच्या नोदीनुसार, बाडातील दोन्ही हस्तलिखित प्रकरणे '' ही मुळची डोमगांव – मठातील होत.''

**बाड २६** **टांकळी मठ**

पृष्ठें : ४८ आकार : सुमारे २७ × १४.४ (सेमी.)

ओळी : प्रतिपृष्ठ सरासरी २८ अक्षरे : प्रतिओळी सरासरी ४४

भाषा : मराठी लिपी : देवनागरी

काल : सुमारे शके १७११ लेखक : मोरो भगवंत सबनीस, सज्जनगड.

टीपा :

श्री. देवांनी नोंद अशी : '' हनुमंतस्वामीनी सांगितलेली मूळची बखर ती ही ही मोडीत लिहिलेली आहे. सुटे २५ उभे बंद आहेत. ते प्रथम एका बाजूस लिहून नंतर शेवटून बंदांच्या पाठीमागच्याहि बाजूस लिहित बाराव्या बंदाच्या पाठींमागें बखरीची समाप्ती झाली आहे.

दुर्दैव मात्र असे की, पहिला संबंध बंद, पंचविसावा अर्धा बंद, असे गहाळ आहेत व बंद ७,८,९,२४,२५ यांच्यातील मधला च थोडा भाग कसरीनें नाहींसा केला आहे.''

बाडाला वेष्टन म्हणून वापरलेल्या कागदावर '' रामदासी मासिक वर्ष २८ पहा आणि '' छापलें १९४९ '' असे लिहिले आहे.

**बाड २७** **टांकळी मठ**

पृष्ठें : २९६ आकार : सुमारे १७.९ × १०.६ (सेमीं.)

ओळी : प्रतिपृष्ठ सरासरी ११ अक्षरे : प्रतिओळी सरासरी २३

भाषा : मराठी लिपी : देवनागरी

काल : सुमारे शके १७०५ लेखक : अनेक, अज्ञात.

बाडात पंधराशेचौदा ओव्या आहेत.

टीपा :

१) बाडातील पृष्ठांना अनुक्रमांक देताना तीन गट (पहिला सदुसष्ट पानांचा, दुसरा पंचावन पानांचा, तिसरा सव्वीस पानांचा) पाडलेले दिसतात. एकूण एकशेअठ्ठेचाळीस पानें म्हणजे दोनशेशहाण्णव पृष्ठें आहेत. त्यापैकी , पहिल्या गटातील १,२५ मा, ३२ मा, आणि ५३ मा, दुसऱ्या गटातील १,१७ मा, २६ मा ३९ मा, ५० मा आणि ५५ मा, तिसऱ्या गटांतील १,६ मा , १९ मा, २४ मा ही पृष्ठें कोरी आहेत.

२) क्र. १ ते १० दासबोधाच्या तिसऱ्या दशकाचे क्रमाने दहा समास, क्र. ११ ते २० सातव्या दशकाचे क्रमाने दहा समास आणि क्र. २१ ते ३० नवव्या दशकाचे क्रमाने दहा समास आहेत. ह्यापैकी , ह्यापैकी, तिसऱ्या दशकाच्या पाचव्या समासात एक ओवी, नवव्या समासात एक ओवी , दहाव्या समासात तीन ओव्या (७२ अंशतः, ७३ व ७४ ) कमी आहेत. सातव्या दशकाच्या आठव्या समासाची अखेरची ओवी अपूर्ण आहे. नवव्या समासाच्या (४६ ते ६० अशा ) पधराच ओव्या आहेत. नवव्या दशकाच्या सहाव्या समासाच्या आठ ओव्या कमी आहेत.

## बाड २८ टांकळी मठ

पृष्ठें : ७४ आकार : सुमारे २१.२ × १२ (सेमीं.)

ओळी : प्रतिपृष्ठ सरासरी ९ अक्षरे : प्रतिओळी सरासरी १८

भाषा : मराठी, हिदुस्थानी लिपी : देवनागरी

काल : सुमारे शके १७०५ लेखक : अज्ञात.

बाडात एकतीस अभंग, पन्नास ओव्या, सहा मराठी व एक हिंदुस्थानी अशी सात पदें आणि तीन दोहे आहेत.

टीपा :

१) नऊ पानें शिवलेंली आहेत आणि बाकीची सर्व सुटी झालेली आहेत. पहिल्या नऊ पानांवर पोंथीसारखे पान आडवे धरून लिहिलेले आहे. तर उरलेल्या पानांवर पान उभें धरून लिहिलेले आहे. १९ क्रमांक दिलेले पान, मधे घडी घातलेले, आकारानें (३७.५× ११.५ सेमीं.) वेगळे आहे. त्यावरचे हस्ताक्षरही वेगळे आहे. कदाचित सर्व पानें एका बाडाची नसतील.

२) पहिले पान (क्रमांकाविना) कोरे आहे. तसेच अखेरची अठरा पानें कोरीं आहेत. ह्याखेरीज , २ मा , ३ मा, ४ मा, ५ मा, ६ मा , ११ मा, १२ मा , १३ मा , १४ मा, १५ मा, १६ मा, १७ मा , ही पृष्ठें कोरी आहेत.

३)  पहिल्या पानावर कोणत्याही पदाची (दुसरे व तिसरे अशी ) दोनच कडवी दिसतात. कदाचित त्याआधींचे एक पान गहाळ आसेल. पृ. १ मा वर कोणकोणत्या पदाच्या ‘सखया रामा सुखधामा’ .. अशादोनच ओळी आहेत. पृ. २ मा वर ‘धनका नाम तुका वाणी ’ रिणको नाम तुका वाणी । एवढेच लिहिलेले आहे. अठराव्या पानाच्या दोन्ही बाजूला फुलांची नांवे गुंफलेली एक ओवी असावी.

४) पुष्कळ ठिकाणी लिहिलेल्याचा अर्थ कल्पनेने जाणावा लागतो. क्र. ११ ते १५ ह्या लेखनाचा अर्थ लागू शकत नाही. क्र. १८ हा चेंडूफळीचा प्रसंग एक (कालियामर्दनकथा.) आहे. क्र. १९ हा प्रसंग दोन असावा . तो अपूर्ण दिसतो.

---

**बाड २९** **टांकळी मठ**

पृष्ठें : ११४ आकार : सुमारे १९ X १२.५ (सेमी.)

ओळी : प्रतिपृष्ठ सरासरी ११ अक्षरे : प्रतिओळी सरासरी १९

भाषा : मराठी, हिदुस्थानी लिपी : देवनागरी

काल : सुमारे शके १६५५ लेखक : अज्ञात.

बाडात तीनशे आठ श्लोक आहेत.

टीपाः

बाडात तीन एकोणसाठ अशी सत्तावन पाने (म्हणजे पानें एकशेचौदा पृष्ठें) आहेत. क्र. १ ते ६ हे विठ्ठल कवीचा सीता स्वयंवराचे सहा मार्ग आहेत. नंतरचे उपलब्ध नाहीत. तसे पहिली दोन पानें गहाळ असल्याने, पहिल्या सर्गाचे आरंभीचे चार श्लोक नाहीत, पाच ते सत्तावन्न असे ५३ श्लोक आहेत.

---

**बाड ३०** **टांकळी मठ**

पृष्ठें : १८ आकार : सुमारे ११.६ X १०.६ (सेमी.)

ओळी : प्रतिपृष्ठ सरासरी ९ अक्षरे : प्रतिओळी सरासरी २९

भाषा : मराठी लिपी : देवनागरी

काल : सुमारे शके १७४४ लेखक : व्यंकटेश बल्लाळ मैजे हसुरक

बाडात एकोणीस ओव्या आहेत.

टीपाः

१) कोणत्याही पोथीची / पोथ्यांची सुटी झालेली ही नऊ पानें आहेत. ती पोथी/ त्या पोथ्या दासबोधाच्या होत्या असे दिसते. नऊ पानांपैकी दोन ते सहा ही पनें अनुक्रमें, दशक पांचते सहा ह्यांची मुखपृष्ठें असून त्यांवर त्या त्या दशकाचा निर्देश आहे. त्यांची दुसरी बाजू कोरी आहे, तसेच पृ. ८ मा व ९ मा कोरी आहेत. नवव्या पानाच्या एका बाजूला लेखनकाल व लेखकाचे नांव हा तपशील आहे. दुसरी बाजू कोरी आहे.
२) पहिल्या पानावर १८ ते २७ अशा नऊ ओव्या आहेत. (१८ वीचा अखेरचा चरण आणि २७ वीचे पहिले चरण) त्यांचा संदर्भ दिलेला नाही. क्र. २ ह्या सहा ओव्या दशक दोन समास दहामधील आहेत. क्र. ३ ह्या चार ओव्या दशक वीस समास दहामधील आहेत.

**बाड ३१** **टांकळी मठ**

पृष्ठें : ६३ आकार : सुमारे २४.६ × १३.४ (सेमी.)

ओळी : प्रतिपृष्ठ सरासरी ९ अक्षरे : प्रतिओळी सरासरी २८

भाषा : मराठी लिपी : देवनागरी

काल : सुमारे शके १७३० लेखक : अनेक, अज्ञात

बाडात तीनशेत्र्याहत्तर आर्या आहेत.

टीपा:

१) बाडात बत्तीस पानें म्हणजे चौसष्ठ पृष्ठें आहेत. क्रमांकाविना, पान कोरे आहे. तशी २० आणि ३१ मा हीं पृष्ठें कोरी आहेत.
२) मोरोपंतांच्या मंत्ररामायणातील (युद्धकांड ) बत्तीस मंत्राच्या ह्या आर्या आहेत. बाडाचे एक पान बहुधा गहाळ असल्याने पहिल्या मंत्राच्या ९ ते १३ अशा पांचच आर्या आहेत. मंत्र एकोणिसच्या दहा आर्या पूर्ण आहेत. अकरावी अपूर्ण सोडली आहे. विसाव्या मंत्राच्या आर्या वगळलेल्या दिसतात. बाविसाव्या मंत्राची एक आर्या पूर्ण आहे.(क्र. २१) दुसरी अपूर्ण सोडली आहे. आणि मधे जागा सोडून, ११ ते १३ अशा तीन आहेत. बत्तीसाव्या मंत्राच्या तीन आर्यानंतर लिहिणे थांबविलेले दिसते.

**बाड ३२** **टांकळी मठ**

पृष्ठें : ३४ आकार : सुमारे ३१.४ × १६ (सेमी.)

ओळी : प्रतिपृष्ठ सरासरी ११ अक्षरे : प्रतिओळी सरासरी १४

भाषा : मराठी लिपी : देवनागरी

काल : सुमारे शके १७०५ लेखक : बहुधा दोन अज्ञात

बाडात दोनशेसत्याऐंशी ओव्या आहेत.

टीपा:

१) दासबोधाच्या एका पोथीची सहा पानें आणि ज्ञानेश्वरीच्या एका पोथीची अकरा पानें अशी सतरा पानें (चौतीस पृष्ठें ), बाडात एकत्र ठेवलेली आहे.
२) क्र. १ हा आठव्या सातवा समास आहे. क्र. २ हा नवव्या दशकाचा नववा समास आहे. क्र. ३ मध्ये भगवद्गीतेच्या पाचव्या अध्यायाचे एकोणतीस (सस्कृत) श्लोक आणि त्यावरील एकशेऐंशी ओव्यांची टीका आहे. मूळ श्लोकांची अनुक्रमणिकेत नोंद केलेली नाही.

**बाड ३३** **टांकळी मठ**

पृष्ठें : ५० आकार : सुमारे २६.२ × १४.७ (सेमी.)

ओळी : प्रतिपृष्ठ सरासरी ११ अक्षरे : प्रतिओळी सरासरी २७

भाषा : मराठी | लिपी : देवनागरी

काल : सुमारे शके १६५५ | लेखक : कोणी अज्ञात

बाडात तीनशेचौपन ओव्या आहेत.

टीपा :

१) नृसिंहसुतांच्या रामायण (सुंदरकांड) ह्या काव्याच्या पोथीची ही ५४ ते ७४ अशी पंचवीस पानें (पन्नास पृष्ठें)आहेत.
२) क्र. १ ते ५ मध्ये, अनुक्रमें बारा ते सोळा असे पाच प्रसंग आहेत.
३) नृसिंहसुत हे कवि जवळ जवळ अज्ञात, निदान अगदी अप्रसिद्ध कवी होऊन गेले. मात्र श्री. देवांच्या मते त्यांची ''कविता बऱ्यापैकीं आहे.''

## बाड ३४ — टांकळी मठ

पृष्ठें : १० | आकार : सुमारे २० × १४.५ (सेमीं.)

ओळी : प्रतिपृष्ठ सरासरी | अक्षरे : प्रतिओळी सरासरी

भाषा : मराठी | लिपी : देवनागरी

काल : सुमारे शके १७०५ | लेखक : अज्ञात

टीपा :

श्री. देवांनी म्हटल्याप्रमाणे ही '' ही पांच अत्यंत जीर्ण पानें '', म्हणजे दहा पृष्ठें आहेत. पाचही पानांच्या एका बाजूवरील लेखन जवळ जवळ पूर्णपणे गेले आहे. दुसऱ्या बाजूवरील बरेच शब्द वाचता येत असले तरी, पानें चार कडांनी चुरगळून फाटलेली आहेत ( तीं काहीशीं कसरीनें खाल्ली असावीत ) त्यामुळे एकही ओळ पूर्ण वाचता सेत नाही. जेवढें वाचता येतें तेवढयावरून हे रामदासांचे अभंग आहेत हे समजते. परंतु एकही अभंग पूर्ण लागत नाही. इतकेच काय, प्रतिपृष्ठ ओळीची सरासरी संख्या आणि प्रतिओळ अक्षरांची सरासरी संख्या ह्याही सांगता येण्यासारख्या नाहीत.

## बाड ३५ — टांकळी मठ

पृष्ठें : १०६ | आकार : सुमारे १३.१ × ७.५ (सेमीं.)

ओळी : प्रतिपृष्ठ सरासरी ९ | अक्षरे : प्रतिओळी सरासरी २१

भाषा : मराठी | लिपी : देवनागरी

काल : सुमारे शके १६०५ | लेखक : अनेक अज्ञात

बाडात तीनशे एकोणपन्नास ओव्या, एकशेनव्याण्णव मराठी व अठ्ठावन संस्कृत मिळून दोनशेसत्तावन श्लोक आहेत.

टीपा :

१) बाडात अनुक्रमांक घातलेली पृष्ठें ९३ असली तरी, पृष्ठ १०,१५,२०,२५,५५,६६,७५,८४,८९,९०,९३ अशा अकरा पृष्ठांच्या मागील कोऱ्या बाजूंना अनुक्रमांक नाहीत. ही तेरा पृष्ठें जमेस धरता, बाडाची पृष्ठसंख्या एकशेसहा भरते.

२) श्री. देवानी बाडाच्या पानांचा आकार “ ५ इंच × २ ।।। इंच ” म्हटला आहे तो बरोबरच आहे. परंतु बाडाची पानें हे “ सारख्या आकाराचे कागद आहेत ” हे त्यांचे विधाान तितकेसे बरोबर दिसत नाही. उदाहरणार्थ, पृष्ठ ६२ ते ६६ हे कागद इतर कागदांच्या तुलनेने थोडे लहान आहेत

३) श्री. देवांनी म्हटल्याप्रमाणे हे, बाड म्हणजे रामदासांच्या “ काही प्रकाशित आणि काही अप्रकाशित , असा लघु प्रकरणांचा तत्कालीन पोथीवजा संग्रह” क्र. १ ते ५ हे मानपचन प्रकरण आहे. क्र. ६ हे दासबोधाचे मुखवस्त्र (विसाव्या बाडाच्या नोंदीमध्ये श्री. देवांनी दिलेल्या संदर्भानुसार. प्रसिद्ध केलेले) आहे. क्र. ७ हे दहा श्लोक हें “५६ वे स्फुट प्रकरण ”, क्र. ८ हे “वीस श्लोकांचे एक सांकेतिक प्रकरण”, क्र.९ हें “शकुनवंती - संस्कृत प्रकरण ”, क्र. ११ हे ”प्रकाशित स्फुट प्रकरणांपैकी ६३ वें स्फुट प्रकरण, क्र. १२ हे पंधरा श्लोक “चातुर्थमान प्रकरणापैकी होत, ” क्र. १३ हें “ हें श्रीसा वि. वि. २८ त छापले आहे,” क्र. १४ “हें बारा ओव्यांचें श्रीसमर्थांचे आज्ञापत्र. श्रीते सां वि. वि. २४ त दिले होते” क्र. १६,१७ व १९ हे येकवीससमासीपैकी, अनुक्रमे, सातवा, दहावा, आणि अकरावा समास” होत. क्र. १८ “हे समर्थांचें श्रीशिवरायास गेलेलें पत्र ” आहे. क्र. २० “ रामावरील एका संस्कृत स्तोत्रांचे पान - श्लोक १४ ते २३”. क्र. २१ हा “परचक्रनिरूपण नाम समास ।।१।। चा अपूर्ण भाग जेवढा आहे तेवढा श्रीसां. वि. वि. २४त दिलेला आहे. क्र. २२ चे तीन श्लोक हे “स्फुट प्रकरण ५७ पैकी” आहेत. क्र. २३ म्हणजे “स्फुट प्रकरण ५ पैकीं ११ ते २० श्लोकांचे एक पान ” क्र. २४ हें “ स्फुट प्रकरण ४२ पैकी फक्त ३,४, व ५ हे तीन श्लोक असलेले एक पान. त्या श्लोकांचा येथे २२,२३,२४ असा क्रम. आहे त्यात शिवाय पांठातर आहे.”

४) श्री. देव ह्याच्या नोंदीमध्ये ह्या प्रकरणांचा क्रम. १,२,३,४,५,६,७,८,१०,११,७,९,१३,१४,२०,२३,२४,२२,२१, असा आहे. तो बाडातील मूळ क्रम असावा.

५) क्र. १५ त १९ ह्या पांच प्रकरणांचा श्री. देवानी स्वतंत्र निर्देश केलेला आहे. त्यांनी म्हटले आहे. “ त्यांत उद्धवांचे हस्ताक्षर आहे. तो बाडातील मूळ क्रम असावा.

   १) येकवीससमासापैकीं सातवा, दहावा आणि अकरावा समास.
   २) विवेक जलिया ... ! हें ... श्रीसमर्थांचें आज्ञापत्र
   ३) निश्चयाचा महामेरू । ... ”

६) बाडांतील प्रकरणांपैकी, क्र. १२,१४,२०,२१,२२,२३,२४, हीं अपूर्ण आहेत. क्र. १२ मध्ये पंधरा श्लोक पूर्ण असून सोळाव्याचा आरंभ आहे. क्र. १४ मध्ये दोन त सहा ह्या पांच ओव्या पूर्ण असून सातव्या ओवीचे दोन चरण आहेत. ‘ तुझेनि भक्तिरंग माजे । ’ ही सहावी ओवी आरंभी लिहून खोडलेली आणि नंतर सहावीच्या जागी लिहिली आहे. त्यामुळें, पहिल्या ओवीला क्र.२ दिलेला आहे. तो तसाच राहिला. क्र. २० मधील १४ ते २२ श्लोकांपैकी पहिला अपूर्ण आहे तसा शेवटी तेविसावा अंशतःच आहे. क्र. २१ मधील २८ ते ४१ ओव्यांपूर्वी सत्ताविसाव्या ओवीचा अंश आहे. क्र. २२ मध्ये १२ ते १४ असे तीनच श्लोक आहेत. क्र. २३ मधील ११ ते २० ह्या श्लोकांपैकी पहिला अपूर्ण आहे. तसा क्र. २४ मधील २२ ते २४ ह्या श्लोकांपैकीही पहिला अपूर्ण आहे.

७) पृ. ६२ - ६४ ह्या पृष्ठांवर बारीक अक्षर आहे (प्रतिपृष्ठ तेरा ओळी आणि प्रतिओळ एकतीस अक्षरे) पृ. ६२ आणि ६७ ह्यांवरील लेखन अनेक ठिकाणी अतिशय अस्पष्ट झालेले आहे. क्र. २३ च्या दोन पृष्ठांचा क्रम उलटा, म्हणजे पृ. ९२ आधी व पृ. ९१ नंतर, असायला हवा.

## बाड ३६ — टांकळी मठ

पृष्ठें : २२ — आकार : सुमारे १२.६ × ८.४ (सेमीं.)

ओळी : प्रतिपृष्ठ सरासरी १२ — अक्षरे : प्रतिओळी सरासरी १३

भाषा : मराठी,हिदुस्थानी, संस्कृत — लिपी : देवनागरी

काल : सुमारे शके १६०५ — लेखक : अनेक अज्ञात

बाडात बारा अभंग. पाच मराठी व पांच हिदुस्थानी मिळून दहा पदें, पंधरा मराठी व दहा संस्कृत मिळून पंचवीस श्लोक आहेत.

टीपा :

१) श्री. देवांनी बाडात “ त्रुटित पत्रें ” अशा दोनच शब्दांत बाडाचे वर्णन केले आहे.

हे बाड म्हणजे एका बाडाची आठ पानें, दुसऱ्या बाडाचे एक पान आणि तिसऱ्या बाडाची (एका कागदाला घडी घालून केलेलीं) दोन पानें अशा अकरा पानांचा (म्हणजे वीस पृष्ठांचा ) समूह आहे. ही तीन बाडातील पानें सारख्यां आकारमानाची नाहीत.

२) श्री. देवांनी क्र. २, १८, २० आणि २३ समग्र उद्धृत केली आहेत. त्यांच्या नोंदीनुसार, क्र. १ “ हे ज्ञानदेवाचे पद काव्यसंग्रहांतील ‘ अनेकविकृत पदसंग्रह भाग दुसरा ’, यात छापलेले आहे, पण अशुद्ध, ” क्र. ४ ला श्री. देवांनी अष्टक म्हटले आहे. त्यात सातच श्लोक दिसतात. क्र. १८ चे सात श्लोक असलेले पान (दुसऱ्या बाडाचे एकच पान), श्री. देवांच्या मते “हे एक पाठपोट पान उद्धवांच्या हातचे दिसते.” क्र. १४ ह्या पृ. १३ वरील पदाच्या कडव्यांना ३ व ४ असे क्रमांक आहेत. कदाचित क्र. ७ च्या (‘अतीत मी खरा’) पदाची पहिली दोन कडवी पृ. ८ वर आणि नंतरची दोन कडवी पृ. १३ वर असे झाले असेल, क्र. १५ हे पद म्हणून नोंदले असले तरी तो एक श्लोक अधिक दुसऱ्या श्लोकाचा अंश असणे शक्य आहे.

३) पृ. ७ वर एक दुर्बोध ओळ आहे. पृ. १२ आणि १६ वर पदांच्या यांद्या (लेखन संकल्प ?) आहेत. पृ. १५ वर तत्वज्ञान ह्या शीर्षकाखाली कांही तत्वांचा उगम लिहिण्याचा प्रयत्न दिसतो.

**बाड ३७** **टांकळी मठ**

पृष्ठें : १८ आकार :

ओळी : प्रतिपृष्ठ सरासरी अक्षरे : प्रतिओळी सरासरी

भाषा : मराठी लिपी : देवनागरी

काल : सुमारे शके १७०५ लेखक : अनेक अज्ञात

बाडात एकशेसाठ अभंग, एक आरती, चार ओव्या, तीन पदें आणि सात श्लोक आहेत.

टीपा :

१) श्री. देवांनी तसे म्हटले नसले तरी, ह्या बाडांतही (बहुदा, पाच वेगवेगळया बाडांची ) नऊ “ त्रुटित पत्रें ” म्हणजे सुटी पानें आहेत. त्यांचे आकारमान वेगवेगळे आहे तशी प्रतिपृष्ठ ओळींची संख्या ह्याही वेगवेगळया आहेत. म्हणून, ह्या नोंदी वर दिलेल्या नाहीत.

२) पृ. १२ आणि १३ कोरी आहेत. पृ. १५ आणि १६ ह्यांची मागील बाजू कोरी आहे. ह्या दोन कोऱ्या पृष्ठांना अनुक्रमांक नाहीत. म्हणून, बाडात अठरा पृष्ठें असूनही अखेरचा पृष्ठक्रमांक सोळा आहे.

३) श्री. देवांच्या नोंदीनुसार , क्र. १ ते सहा श्लोक श्रीसां. वि.वि. ३१ मध्ये प्रकाशित झाले होते. “हें जयरास्वामींचे कृष्णाप्पावर पद श्रीसां वि.वि. ३८.” क्र. ७ व ८ ही “गोविंदात्मज प्रल्हादकृत ‘नरसिंपुर सामराज नरहरि ’ वर दोन पदे ” आहेत.

४) पृ. १५,१६ ही अधिक जीर्ण पृष्ठें आहेत. क्र. ७ ह्या पदांची, बहुधा, अखेरची ओळ बरीच फाटलेली असल्याने त्या पदाचे चवथे कडवे अपूर्ण राहिलेले आहे.

**बाड ३८** **टांकळी मठ**

पृष्ठें : १० आकार : सुमारे ५१.६ × १४.६ (सेमीं.)

ओळी : प्रतिपृष्ठ सरासरी २० अक्षरे : प्रतिओळी सरासरी १६

भाषा : मराठी लिपी : मोडी

काल : सुमारे शके १७५५ लेखक : अज्ञात

टीपा :

१) श्री. देवांनी तसे म्हटले आहे की :‘‘र्हीं मोडीत लिहिलेल्या एका बखरीची पहिलीं अवघी पांच पानें आहेत. मथळयावर श्रीकाराचे खाली ‘‘ ही बखर अमृत गणेश बरवे याची बखर असे ’’ असा मजकूर असून तो खोडलेला आहे. व उजवे बाजूस ‘‘ एकापासून तर अडुसष्ट पावेंतो असे’’ असा मजकूर असून तोहि खोडलेला आहे. डावे बाजूस मात्र १० चा अंक, त्या खाली रेघ देऊन ६८ चा अंक कायम आहे. ... ६३ पृष्ठें म्हणजे वस्तुत: सर्वच बखर अनुपलब्ध ... ’’ पांचही पानांवर एकाच बाजूस लिहिलेले आहे.

२) ह्या पांच पानांसोबत ठेवलेल्या एका कागदावर, बहुधा V S हया आद्याक्षरांकित एक सूचना लिहिलेली आहे. तिची तारीख 28/07/31 आहे. बहुधा नंतर, सूचनेचा वर Printed in Ramdasi issue No. 142 असा शेरा आहे.

**बाड ३९** **टांकळी मठ**

पृष्ठें : १०६ आकार : सुमारे १९.८ X १४.३ (सेमीं.)

ओळी : प्रतिपृष्ठ सरासरी १६ अक्षरे : प्रतिओळी सरासरी १४

भाषा : मराठी,संस्कृत लिपी : देवनागरी

काल : सुमारे शके १६८० लेखक : महादेव बाबा पानगव्हाणे व इतर

बाडात सातशेचौऱ्याहत्तर ओव्या, दोन पदें व सात संस्कृत श्लोक आहेत.

**टीपा :**

१) बाडात त्रेपन्न पानें, म्हणजे एकशेसहा पृष्ठें आहेत. पृष्ठांना अनुक्रमांक देताना अनेक घोटाळे झाले आहेत. उदाहरणार्थ, १ व २ हे पानांचे अनुक्रमांक आहेत, पृष्ठांचे नाहीत. पृ. ५ ची मागील बाजू कोरी असू, तिला अनुक्रमांक नाही. एकाच पृष्ठाला ७० व ७१ असे दोन क्रमांक आहेत. एकाच पृष्ठाला ७६ व ७७ असे दोन क्रमांक आहेत. इ. शेवटच्या पृष्ठाला क्रमांक १०५ असला तरी बाडाची पृष्ठसंख्या १०६ आहे.

२) बाडाची पानें जीर्ण असून, अनेक पानें फाटल्यामुळे त्या त्या पानांवरची अक्षरें गेलीं आहेत. उदाहरणार्थ पृ. १,१ मा ३६ ते ४६ इत्यादि.

३) श्री. देवांनी म्हटल्याप्रमाणे, ‘‘बाड अपूर्ण आहे. आरंभीची , शेवटची व मधली काही काही पानें गेली आहे. ’’अशी किती पानें गहाळ आहेत हे सांगता येण्यासारखे नाही.

४) पृष्ठांचा अनुक्रम अनेक ठिकाणी चुकला आहे. पृ ४५ नंतरच्या पृष्ठांचा क्रम ४८, ४९, ५०, ५१, ५२, ५३, ४६, ४७, ५५, ५४, ५७, ५६,५९,५८,६१,६०,६२ असा असायला हवा. पृष्ठ १०१ नंतर १०३,१०२,१०४,१०५ असा क्रम हवा.

५) श्री. देवांनी म्हटल्याप्रमाणे ,बाडात ‘‘तीन ग्रंथ आहेत.’’‘हरिहरदासस कृत पवनविजय’ (उपलब्ध ओव्या २०४), ‘मूळस्तंभ नावांचा’(दत्तात्रय अवधूतांचा?) अपूर्ण ग्रंथ आणि भागवताचा, कोणा अज्ञात कर्त्याचा, काही भाग. अनुक्रमणिकेत नोंदल्याप्रमाणे मूळस्तंभाच्या (क्र.६) दोनशेनव्वद ओव्या उपलब्ध आहेत. तर भागवताच्या (क्र.७) १ते१५८ आणि १८७ ते २१८ (२१९ अंशात:) अशा एकशेनव्वद ओव्या उपलब्ध आहेत.

६) पृ. ७८ वर ‘‘हस्ताक्षर माहादेव बाबा उपनाम पानगव्हाणे त्याचे पुस्तक ’’ असे लिहिलेले असले तरी ते ‘मुळस्तंभ’ त्या ग्रंथापुरते असावे. अक्षर पाहता, भागवतही ह्याच लेखकाने लिहिलेले असावे. परंतु पृ. १ ते ५ ह्यातील हस्ताक्षर वेगवेगळे दिसते. तसे ‘पवनविजय’ ग्रंथाचे अक्षरही वेगळे आहे.

**बाड ४०** **टांकळी मठ**

पृष्ठें : ४८ आकार : सुमारे १५.९ X ९.७ (सेमीं.)

ओळी : प्रतिपृष्ठ सरासरी १६ अक्षरे : प्रतिओळी सरासरी १६

भाषा : मराठी,संस्कृत लिपी : देवनागरी

काल : सुमारे शके १६८० लेखक : बहुदा अनेक, अज्ञात.

बाडात एकशेअठ्ठ्याऐंशी ओव्या आहेत.

**टीपा :**

१) श्री. देवांनी नोंदल्याप्रमाणे, ''ही ४ ते २९ सुटी पानें आहेत. त्यांत फक्त मधली २२ व २३ ही दोन पानें ... आरंभीची ३ पृष्ठें गेली आहेत व २९ नंतरची किती पृष्ठें गेली असतील ती खरी '' तेव्हा बाडात चोवीस पाने, म्हणजे अठ्ठेचाळीस पृष्ठें , आहेत. अनुक्रमणिकेत पानांचे क्रमांक नोंदले आहेत.
२) पान चारवर सातराव्या ओवीच्या तीन चरणांनी आरंभ झाला आहे व पान एकवीस च्या मागील बाजूवर अखेरी एकशेअठ्ठावनावी ओवी आहे. पान चोवीसवर एकशेसत्तराव्या ओवीपासून पान एकोणतीसच्या मागील बाजूवर अखेरी दोनशेएकोणतिसावी ओवी आहे.
३) उपलब्ध बाडावरून, ग्रंथाचे नांव, विस्तार , कर्त्याचे नाव हा तपशील सांगता येत नाही.

**बाड ४१** **टांकळी मठ**

अनेक सुटी पानें आणि कागद – कागदाचे तुकडे ह्यांचा संग्रह.

**टीपा :**

१) ह्या बाडात ''कागदांचे ५४ तुकडे आहेत. '' असे जे श्री. देवांनी म्हटले आहे ते बाडाच्या आजच्या स्थितीशी जुळत नाही. बाडातील कागदांना दिलेले अनंक्रमांक पाहता, एकूण ७६ 'कागद' आहेत. (क्र. ५५ चा कागद नाही. क्र. ७१ व ७२ असे वेगळे क्रमांक दिलेलीं दोन पानें, एकाच बाडातील सुटी पाने आहेत तसे दिसल्यावरून क्र. ७१ ची मानली. तेव्हा शेवटच्या पानाचा क्रमांक ७८ असला तरी, कागदांची संख्या ७६ मानने योग्य ठरेल.) अनेक क्रमांक एकेका पानाला/कागदाच्या तुकड्याला दिलेले नसुन दोन किंवा अधिक पानांना मिळून दिलेले आहेत. एका बाडाची सव्वीस पाने आणि दोन वेगळया बाडाची प्रत्येकी तीन पाने हा सर्वाना मिळून ११ हा क्रमांक दिलेला आहे. शिवाय, १३.१० सेमी. (क्र.७४) किंवा १४.३ × १३.६ सेमी. (क्र. ७३) ह्या आकाराच्या कागदांना 'तुकडे' म्हणणे योग्य आहे. पण, ५७ × १६.१ सेमी. (क्र.४३) किंवा ६१.२ × ३३ सेमी. (क्र. १६) ह्या आकाराच्या कागदांना तुकडे म्हणणे फारसे अन्वर्थक वाटत नाही.
२) बरेच कागद फाटलेले/कसरीने खाल्लेले असल्याने त्यावरील पदरचना नीट लागत नाही. क्वचितच शाई उडाल्याने येत नाही.
३) क्र. ८ हा कोणत्याही पीराच्या मंत्रतंत्राचा भाग आहे. (''हम दो बार करे. आ ईलाही लला महमद रसूला ...'') क्र. ११ मधील श्लोकांचे दोन गट (११.२ व ११.३) हे रामदासांच्या रामायणांतील शतांपैकी आहेत. तर तिसरा एक गट (११.४) मनाच्या श्लोकांचा आहे. क्र. १६ ही रामदासांची सात मारूतीस्तोत्रे आहेत. क्र. १७ मध्य विषबाधेवर उतारे आहेत क्र. २१ मध्ये रामदासांच्या पस्तीस ओव्या आहेत असे दिसते. परंतु, कागद जागोजागी फाटलेला असल्याने, एकही ओळ पूर्ण वाचता येत नाही. क्र. २६ मध्ये श्री. देवांनी उल्लेखिलेली ''एरंडोल तालुक्यातील पद्मालय येथील गणपतीवर आरती आहे.क्र. ४७ मध्ये(४७.१ ते ४७.९) ताटीचे अभंग आहेत. निवृत्तेश्वरी ह्या नावाच्या पुस्तकाचा निर्देश असल्याने, कुतूहलाने, श्री. देवांनी जी पुस्तकांची यादी उद्‌धूत केली आहे ती क्र. ५४ वर आहे. क्र. ५८ वरील ओव्या ४ ते १९ असून शिरोभागी 'आत्माराम आरंभ' असे म्हटले आहे क्र. ७० ही कोणत्याशा हस्तसामुद्रिकाविषयीच्या पोथीची आरंभीची दोन पाने दिसतात. ('सांगते सामुद्रिके ।। ९।। ते – सांगेन प्रकार सामुद्रिकी ।। '' )
४) एकाद – दुसरी ओळ लिहून सोडून दिलेल्या पदरचनांची, तसेच अपूर्ण पदरचनांची नोंद अनुक्रमणिकेत नाही.
५) क्र. १०.१ मधील सहा ओव्या १७ ते २२ अशा आहेत, ११.२ मधील श्लोक २५ ते ३६, ११.३ मधील श्लोक ५१ ते ६० असे आहेत, १८.१ मधील अभंग २ ते ४ आहेत, २५.१ मधील अभंग ३ ते ६ आहेत. ४४.२ मधील पदाची कडवी ४ ते ७ आहेत. ५१.१ मधील ओव्या ४ ते १९ तर ५९.१ मधील ओव्या १८ ते ३० आहेत, ७१.१ (ध्रुवाख्यान) मधील श्लोक ४ ते ११ , १४ ते २१ आणि अखेरचे ३० असे आहेत.
६) श्री. देवांनी पदरचनांच्या याद्यांचा उल्लेख केला आहे. अशी सर्वांत लांब याद्या क्र. ११ मध्ये आहेत क्र. २२ , ५२ व ७७ मध्येही याद्या आहेत.
७) क्र. १७, ५३, ६० व ७६ मध्ये किरकोळ मोडी लेखन आढळते.

**बाड ४२** **टांकळी मठ**

**टीपाः**

१) बाडाविषयी श्री. देवांचे मत असे : ''निव्वळ गळाठा. तथापि टाकतां येत नाही. आज तो गळाठा वाटतो त्यातीलच एकादा कागदाचा तुकडा उद्या महत्वाचा वाटावयाचा.''

२) निव्वळ गळाठा असूनही, फाटक्या पानांची संख्या आणि फाटण्याचे प्रमाण मोठे वाटत नाही.

३) क्र. ३ हे आत्मारामाच्या आरतीचे एक कडवे पूर्ण व दुसरे अपूर्ण आहे. क्र. ५ व ६ मधील काही शब्द कागद फाटल्याने गहाळ आहेत. क्र. ८ च्या कागदावर मागच्या बाजूला एक शिक्का तीनदा उमटविलेला दिसतो. क्र. १० मध्ये श्लोक १ ते ४ व ९ ते १२ एवढेच वाचता येतात. क्र. १४ मध्ये ९ ते २१ श्लोक पूर्ण आहेत. ही पोथी गीतामाहात्म्य नावाच्या ग्रंथाची असावी. क्र. २२ मध्ये दासबोधाची आरती आहे. क्र. ३० मधील अभंगाचे बरेच शब्द, कागद फाटल्याने गहाळ आहेत. क्र. ४६ वर काही 'चिजां' चे लेखन (उदाहरणार्थ, धृपद, ठुमरी इ. ) दिसते. त्याची नोंद अनुक्रमणिकेत केलेली नाही. ४६.२ व ४६.३ हे अनुक्रमे, सवाल व जबाब दिसतात. ४६.२ चे शीर्षक ''श्री. दत्तात्रय फकीरवेशे रामदासे पृच्छा करीति '' असे आहे. तर ४६ चे शीर्षक ''समर्थ वदति'' असे आहे. क्र. ४७ वरील लेखनाचा उलगडा झाला नाही. परंतु ते पद्य नसावे.

**बाड ४३** **टांकळी मठ**

बाड, दुर्देवाने, गहाळ झालेले आहे.
श्री. देवांची नोंद अशी आहे
''पत्रे यादी, वगैरे
की पत्रे वगैरे, श्री. संप्रदायाची कागदपत्रे द्वितीय खंड, या पुस्तकात लेखक ५२७ ते ५५० म्हणून छापलेली आहेत.''

**बाड ४४** **टांकळी मठ**

पृष्ठें : ७८ आकार : सुमारे १८.६ × १०.४ (सेमीं.)

ओळी : प्रतिपृष्ठ सरासरी ८ अक्षरे : प्रतिओळी सरासरी २०

भाषा : मराठी लिपी : देवनागरी

काल : सुमारे शके १४५५ लेखक : अज्ञात.

बाडात चारशेछत्तीस ओव्या आहेत.

ओव्या ४३६ षटकर्मी ब्राह्मणु । वेदशास्त्री प्रविणु ।

टीपा :

१) श्री. देवांची नोंद अशी : ''ही सहज चारशे वर्षामागे लिहिलेली एक पोथी आहे. ती एकनाथांच्याहि पूर्वीची आहे, असे लिपीवरून म्हणतां येतें., दुर्देव की पोथी अपूर्ण आहे. तिची फक्त ३ ते ४१ पानें आहेत. ग्रंथ ओवीबद्ध असून त्यात शूकजन्मकथा वर्णिलेली दिसते. १४ ते ४४९ ओव्या आहेत. पहिल्या दोन पानांत १३ ओव्या व शेवटची किती पाने आणि किती ओव्या गेल्या देव जाणे. ग्रंथकाराचे नाव आढळत नाही.''

२) ह्याच दीर्घ रचनेचे अध्याय केलेले नाहीत हे थोडे आश्चर्यकारक आहे. पोथीचे कागद जीर्ण झालेले आहेत.

**बाड ४५** **टांकळी मठ**

पृष्ठे : १७६ आकार : सुमारे १५.७ × १०.४ (सेमीं.)

ओळी : प्रतिपृष्ठ सरासरी १३ अक्षरे : प्रतिओळी सरासरी १०

भाषा : मराठी लिपी : देवनागरी

काल : सुमारे शके १६०५ लेखक : अनेक,अज्ञात

बाडात एकशेत्रेपन अभंग, तीन आरत्या, तीन ओव्या, बावीस पदें, बहात्तर मराठी श्लोक व काही पूजापाठाचे संस्कृत श्लोक आहेत.

**टीपाः**

१) श्री. देवांनी म्हटलें आहे. ''सुमारे शंभर पृष्ठांचे हें जूनें बाड आहे. ते महत्वाचें आहे.त्यांची मधून मधून कांही पृष्ठें गहाळ झाली आहेत. हें दुर्दैव होय.'' आज बाडात अठ्ठयाऐंशी पाने आहेत. मूळ बाडात सुमारे शंभर पाने होती असे मानले तर सुमारे बारा पानें गहाळ झाली. आरंभीचे किमान एक पान गहाळ असले पाहिजे, यामुळे क्र. ३२ चे ९ ते २४ हे श्लोक गहाळ आहेत. पान ३६ व ३७ हयांच्या दरम्यानचे किमान एक पान गहाळ असले पाहिजे, त्याामुळे क्र ४०ह्या पदांची पहिली दोन कडवी गहाळ आहेत. पान ४८ व ४९ हयांच्या दरम्यानचे किमान एक पान गहाळ असल्याचे क्र. ४६ मधील पहिले तीन अभंग गहाळ आहेत. ह्याखेरीज, पान ९ व १० ह्यांच्या दरम्यानची काही पाने गहाळ असावीत.

२) पानांना दिलेले अनुक्रमांक सदोष आहेत. उदाहरणार्थ, चौदानंतरच्या एका व सोळानंतरच्या एका व सोळानंतरच्या एका पानाला अनुक्रमांक नाही. ह्या पानांना, अनुक्रमे, १४ अ व १७ अ असे म्हटले आहे.

३) पान १७ वर रामाच्या वानरसेनेतील काही प्रमुखांची नावे आहेत.(पृष्ठ १५ मा वर नुसतेच ग्रंथारंभीचे नमन आहे.) पृ. वर बधिरत्वावर औषध सांगितले आहे. ६५ मा व ६६ मा वर 'यादी बुका' व 'यादी गुलाल' पृष्ठ ७२ मा ते ७५ औषधोपचार सांगितले आहेत. तसे पृ. ८५ वरही आहेत.

४) पृ.३ मा, १५, १६, १६, मा, १७ अ , मा, २८ मा, २९, २९ मा, ३०, पाने ३१ ते ३६, ४५ ते ४८, पृ.५४ मा. ५५, ६२, ६२ मा, ६३, ६७, ६९, पाने ७६ ते ८४ व ८६ कोरी आहेत.

---

## बाड ४६ टांकळी मठ

पृष्ठे : ६४ आकार : सुमारे १४.१ × १२.२ (सेमीं.)

ओळी : प्रतिपृष्ठ सरासरी ९ अक्षरे : प्रतिओळी सरासरी १२

भाषा : मराठी, संस्कृत लिपी : देवनागरी

काल : सुमारे शके १७०५ लेखक : अनेक,अज्ञात

बाडात चार अभंग, एक आरती, सोळा मराठी व चौदा संस्कृत असे तीस श्लोक, चौदा सवाया आणि एक संस्कृत मंत्र आहे.

**टीपाः**

१) आरंभी 'अथ व्यास लिख्यते ' असे म्हणून 'अस्य श्रीरामत्रयोदशाक्षामंत्रस्य' इत्यादी मंत्र आहे. पृ. १ मा वर लेखन, खाली डोके वर पाय असे, उलटे आहे. क्र. १ मध्ये '' वामनपंडितकृत हरीच्या ध्यानाचे श्लोक आहेत. श्रीमत्‌भागवतात तृतीय स्कंधांत कपिल महामुनींनी मातेस केलेल्या उपदेशाचे हे श्लोक आहंत. मूळ श्लोक, १४, टीकेचे श्लोक १४, सवाया १४, नमनाचा श्लोक १ व पद्धती श्लोक मिळून ४४'' अनुक्रमणिकेत फ क्त मराठी श्लोकांचा निर्देश आहे. क्र. २ ही संतांची आरती आहे.

२) पृ. २९ मा वर औषधाची नोंद आहे. पृ. ३० पानें ३१,३२ कोरी आहेत.

३) बाडाची पानें कसरीनें खाल्ल्यामुळे काही पानांवरील काही अक्षरें गेली आहेत.

---

**बाड ४७** **टांकळी मठ**

पृष्ठें : ८८ आकार : सुमारे ९.६ × ६.२ (सेमीं.)

ओळी : प्रतिपृष्ठ सरासरी १५ अक्षरे : प्रतिओळी सरासरी १०

भाषा : मराठी, संस्कृत,हिंदुस्थानी लिपी : देवनागरी

काल : सुमारे शके १६०५ लेखक : अज्ञात

बाडात तीन मराठी व एक हिंदुस्थानी अशी चार पदें, एकोणसाठ मराठी व एक संस्कृत असे साठ श्लोक वीस दोहे, चार मराठी व व एक हिदुस्थानी मिळून पांच सवाया आहेत.

**टीपाः**

१) पानांना अनुक्रमांक देताना १) अखेरचे पान हे पहिले समजून त्याला क्रमांक १ दिलेला दिसतो. बाडाच्या पहिल्या पानाला (ज्यावर 'टाकळी ४७' अशी नोंद आहे.) क्रमांक २ मिळाला आहे. २) पान ११ नंतरच्या एका पानाला क्रमांक देण्याचे राहून गेलेले दिसते. त्यामुळे चव्वेचाळीस पानांच्या ह्या बाडाच्या अखेरच्या पानाला क्रमांक ४३ मिळाला आहे.

२) पान आठ उभे अर्धे फ ाटलेले आहेत (किंवा कसरीने खाल्लेले आहेत) त्यामुळे कित्येक पदरचनांमधील त्या ठिकाणची अक्षरे गेली आहेत.

३) पृ. ११ ते १२, १३, १४, २३ ते २८, ३० ३१ ते ३२ ह्यावर त्रिपुटीपासून षोडशपुटीपर्यंतची उदाहरणे आहेत. पृ. २ ते ५ शकुन सांगितलेले आहेत. पृ. १ (म्हणजे, खरोखर, अखेरचे पान ) वर औषधांची नोंद असून, पृ. १ मा उपनिषदांतील महावाक्यांचा अर्थ संक्षेपाने दिला आहे. पान ९ ते ११ शब्दसूची आढळते.

४) पृ. ६, ८, ८, मा , १२ मा, १३ मा, १४ मा, १५, १५ मा, १६, २२ २२ मा, २९ मा, ३५ मा, ३६ मा, ३८ मा, ३९ मा, ही पृष्ठें कोरी आहेत. उरलेल्या पृष्ठांवर शक्य तितक्या लहान अक्षरात जास्तीत जास्त लेखनाचा यत्न दिसतो.

**बाड ४८** **टांकळी मठ**

पृष्ठें : ३७६ आकार : सुमारे २३.४ × १४ (सेमीं.)

ओळी : प्रतिपृष्ठ सरासरी १५ अक्षरे : प्रतिओळी सरासरी २५

भाषा : मराठी, संस्कृत लिपी : देवनागरी

काल : सुमारे शके १६३४ लेखक : अज्ञात

बाडात तीन हजार तीनशे अठ्ठावीस ओव्या आहेत.

**टीपाः**

१) हे बाड म्हणजे अष्टावत्र नांवाच्या श्लोकबद्ध संस्कृत ग्रंथावरील ‘सिद्धात चिंदबरी’ नांवाच्या, वैद्यनाथकृत ओवीबद्ध मराठी टीकेची प्रत आहे. प्रतीचा लेखनकाल अखेरी नोंदला आहे. तो ‘‘शके १६३४ नंदननाम संवत्सरे भाद्रपद शुध १२ द्वादशी सोमवासरे असा’’ आहे.

२) श्री. देवांची नोंद अशी. ‘‘ग्रंन्थाची एकंदर २१ प्रकरणे आहेत.पण या प्रतीत आरंभ प्रकरण पूर्ण असून त्याची १ ते ८ पत्रें आहेत. नंतर पृष्ठ ३६ पासून दुसरें प्रकरण सुरू झालें. पुन्हा मधलीच १०९ ते ११३ पत्रें म्हणजे १३ वे व १४ वे अशी प्रकरणे नाहीत. शेवटचे पृष्ठाचा अंक २२२ आहे. ’’ आज १ ते ८, ३६ ते १०८, ११४ ते ११७ आणि १२० ते २२२ अशी १८८ पानें (३७६ पृष्ठें) उपलब्ध आहेत. एकूण २२ प्रकरणांपैकी एक, तेरा, चौदा आणि पंधराव्या प्रकरणाचा काही भाग गहाळ आहेत. प्रास्ताविक म्हणून सुरवातीला असलेले आरंभप्रकरण धरून प्रकरणे बावीस म्हणता येतील. एक, तेरा व चौदा वगळता, बाकीच्या प्रकरणांची नोंद, क्रमाने, अनुक्रमणिकेत आहे.

३) पोथीच्या अखेरी लेखनकालाची नोंद आहे तशी ‘‘ ग्रंथसंख्या ५००० ’’ अशी नोंद आहे. परंतु, अष्टावक्राचे मूळ संस्कृत श्लोक व मराठी टीकेच्या ओव्या ह्यांची स्वतंत्र गणना दिसत नाही. तेव्हा ५००० ही दोन्ही मिळून संख्या असावी. उपलब्ध बाडात त्यापैकीं ३३२८ श्लोक व ओव्या आहेत, श्री. देवांनी म्हटले आहे. ‘‘भारत इतिहासात संशोधक-मंडळाच्या शके १८३५ च्या इतिवृत्तात तंजावर येथील श्रीसरस्वतीमहालातील प्राकृत ग्रंथांचे जे टाचण प्रसिद्ध केले होते, त्यांतही सिद्धांतचिदंबरीची नोंद आहे. त्या प्रतीचा लेखनकाल शके १५७३ दिलेला आहे. त्या प्रतीची ग्रंथसंख्या ३८५० दिलेली आहे. ’’

## बाड ४९ टांकळी मठ

| | |
|---|---|
| पृष्ठें : ४८ | आकार : सुमारे २४.४ × १५.५ (सेमीं.) |
| ओळी : प्रतिपृष्ठ सरासरी ११ | अक्षरे : प्रतिओळी सरासरी २६ |
| भाषा : मराठी | लिपी : देवनागरी |
| काल : सुमारे शके १७४६ | लेखक : अज्ञात |

**टीपाः**

श्री. देवांनी नोंद.

‘‘श्रीशनिश्वरस्तोत्र, तात्याजी महिपतिकृत ओवीसंख्या ३७८ लेखनकाल शके १७४६ श्रावण शुद्ध १५ प्रतीचा मूळ मालक बाळाराम तांबट कसबे नाशिक ठिकाण महले तांबट आळि त्रिंबक दरवाजा. सदरहू पोथी बाळाराम तांबटाने शके १७५७ त टांकळीस मारूतीच्या पायापाशी मठपतीस अर्पण केली. स्तोत्र छापले गेलेले आहेच.’’

पोथीच्या अखेरच्या पानावर वरील सर्व तपशीलाची नोंद आहे.

पोथीचीं पानें कसरीने खाल्लेली दिसतात.

## बाड ५० टांकळी मठ

पृष्ठें : ३५८ आकार : सुमारे २६.६ × १४.८ (सेमीं.)

ओळी : प्रतिपृष्ठ सरासरी ११ अक्षरे : प्रतिओळी सरासरी २६

भाषा : मराठी, संस्कृत लिपी : देवनागरी

काल : सुमारे शके १७०५ लेखक : अज्ञात

बाडात एक हजार नऊशें शहाण्णव श्लोक आहेत.

टीपा:

१) बाडाची १७९ पानें उपलब्ध आहेत. पान १५४ च्या मागील बाजूस क्रमांक १५५ दिलेला आहे आणि अखेरच्या एका बाजूस १८० तर दुसऱ्या बाजूस १८१ क्रमांक दिलेला आहे. अखेरच्या पानाचा क्रमांक १७९ हवा.
२) अखेरच्या पानाच्या बाजूवर वामन पंडितांच्या ३९ रचनांची एक यादी दिलेली आहे. त्यापैकीं १७ रचना, पूर्ण किंवा अपूर्ण बाडात आहेत. क्र. १ ते ३ रामायणाचे तीन अध्याय आहेत. क्र. ४ ते १२ हरिविलासांची नऊ प्रकरणें आहेत. क्र. १३ ते १६ ही वनसुधेचीं चार प्रकरणे आहेत. क्र. १७ ही ब्रह्मस्तुति आहे. क्र. १८ ते २० ही वेणुसुधेची तीन प्रकरणें आहेत. क्र. २१ ते २५ हीं द्वारकाविजयाची पांच प्रकरणे आहेत. क्र. २६ हा मुकंदविलास आहे. क्र. २७ ते ३७ नामसुधेच्या तीन अध्यायांचे मिळून बारा चरण आहेत. क्र. ३९ राजयोग, क्र. ४० प्रियसुधा, क्र. ४१ गजेन्द्रमोक्ष, क्र. ४२ भीष्मप्रतिज्ञा, क्र. ४३ तत्वमाला आणि क्र. ४४ चित्सुधा आहे. क्र. ४५ ते ५२ स्फुट श्लोक असून, क्र. ५३ ही चतुःश्लोकीपैकी भागवतावर टीका दिसते. मूळ संस्कृत श्लोक सहा आहेत असे दिसते. कदाचित अखेरचे दोन चतुःश्लोकीपैकीं नसतील. पहिल्या चार श्लोकांवर प्रत्येकी एक टीका श्लोक आहे, तसा पाचव्या श्लोकांवरही एकच टीका-श्लोक आहे. सहाव्या श्लोकावरील टीकेचे पांच श्लोक आहेत. मूळ संस्कृत श्लोकांपैकीं फक्त पहिला श्लोक समग्र उद्धृत केलेला असून उरलेल्या पाच श्लोकांचा अगदी संक्षेपानें निर्देश आहे. श्लोकांच्या गणनेत मूळ संस्कृत श्लोक जमेस धरलेल नाहीत.

## बाड ५१ डोमगांव मठ

पृष्ठें : ९२४ आकार : सुमारे २४.७ × २१.१ (सेमीं.)

ओळी : प्रतिपृष्ठ सरासरी १८ अक्षरे : प्रतिओळी सरासरी २८

भाषा : मराठी, संस्कृत ,हिंदुस्थानी लिपी : देवनागरी

काल : सुमारे शके १६०१ लेखक : कल्याणस्वामी

बाडात एक हजार नऊशें शहाण्णव श्लोक आहेत.

टीपा:

बाडांत तीन हजार आठशे चौपन ओव्या, पांच हजार तीनशे त्र्याण्णव मराठी, पांच हिंदुस्थानी व बारा संस्कृत मिळून पांच हजार पाचशे दहा श्लोक, एकशे एक्केचाळीस मराठी व अकरा हिंदुस्थानी मिळून एकशे बावन सवाया आणि पंचवीस धाटया आहेत.

टीपः

१) श्री. देवांनी म्हटले आहे की ''श्रीसमर्थांच्या कवितेचे हें प्रचंड बाड सबंध श्री. कल्याणस्वामींच्या हातचें आहे. अथपासून इतिपर्यंत अक्षर एकसारखे सुंदर आहे.'' त्यांनी म्हटल्याप्रमाणें, बाड प्रेक्षणीय आहे. ह्यात शंका नाही. परंतु बाडाचे हस्ताक्षर व लेखन अथपासून इतिपर्यंत अक्षर एकसारखे दिसत नाही. उदाहरणार्थं, पृ. ६३६ ते ६४० वरील मारूतीस्त्रोत्रें पहाः पृ.६३९ वरील ओळी तिरप्या दिसतात. पृ. ७१७ वर, एकाखाली एक असे दहा श्लोक आहेतः तर पृ. ७१८ वर, एकापुढे एक असे गद्यलेखनासारखे, चौदा श्लोक आहेत. पृ. ८७३ वरील श्लोकांचे हस्ताक्षर आणि त्याच्या खाली लिहिलेल्या दोन सवायांचे हस्ताक्षर हीं वेगळी वाटतात.

२) श्री. देवांनी म्हटल्याप्रमाणे बाडाची पृष्ठसंख्या ९२४ (४६२ पानें ) आहे. ''सर्व पानांची लांबी ९/१ इंच आहे, पण मधोमधच्या पानांची रूंदी ७ इंच आहे तर अगदी वरच्याची १० इंच आहे. अशी या बाडाची रचना आहे. ते मधोमध पोटांतून जाड सुतळींने शिवलेलें आहे. दोन्ही बाजूचे पुठ्ठे खूप लठ्ठ आहेत.'' हे नंतरचे  हे नंतरचे वर्णन बाडाच्या आजच्या स्थितीचे नाही. बाडाची अतिशय जीर्ण, क्वचित कसरीने खाल्ल्यासारखी भोकें पडलेली पानें सुटी करून प्लास्टिक आवरणात ठेवलेली असून त्यांचे शंभर शंभर पानांचे खंड केलेले आहेत. ह्या उपायाने पानें बरीच सुस्थितीत राहिलेली दिसतात.

३) श्री. देवांची नोंद अशी ''पृष्ठ २२२ वर प्रताप मारूतींचे चित्र काढलेंले आहे व पृ. २२३ वर कोण महंताचे चित्र आहे.'' बाडाच्या नवीन रचनेमध्ये, पृ. ४२६ व ४२७ वरील ह्या चित्रांच्या प्रतिमा प्रत्येक खंडाच्या आवरणावर, मुखपृष्ठ व मलपृष्ठांवर, कलापूर्ण रीतीने दिलेल्या आहेत.

४) क्र. १ हे सुंदरकांडाचे पहिले शत असून, क्र. २ ते १४ हीं युद्धकांडाची, क्रमाने, एक ते तेरा शतें आहेत. क्र. १५ ह्या प्रास्ताविक पाच ओव्यानंतर क्र. १६ ते २९ ही, क्रमाने, ओव्यांची एक ते चौदा शतें आहेत. क्र. ३० ते २८० पर्यंत स्फुट ओव्या आहेत. क्र. २८१,२८३, २८५, २८७, २८९, २९५ आणि हे स्फुट श्लोक मधेच आले आहेत. एरवी, क्र. ३६४ पर्यंत सलगपणे स्फुट ओव्या चालल्या असत्या. नंतर, क्र. ३६५ ते ३७० षड्रिपु क्र. ३७१ ते ३७५ पंचीकरणयोग, क्र. ३७६ ते ३७९ चतुर्थमान, क्र. ३८० ते ३८४ मानपंचक, क्र. ३८५ ते ३८९ पंचमान हीं श्लोकबद्ध प्रकरणें आहेत. त्यानंतर, क्र. ६११ च्या २५ धाटयांचा अपवाद वगळता, क्र. ३९० पासून ८०४ पर्यंत स्फुट श्लोकरचना आहे. त्यांत क्र. ४३२ हे आनंदवनभुवनी, क्र. ४५८ हे अध्यात्मसार, क्र. ५१९ भागवत, क्र. ५७६, ५९१ ही दशकें आहेत. क्र. ६४० आणि ७५२ हे हिंदुस्थानीं श्लोक आहेत. क्र. ८०५ हे मनाचे श्लोक असून क्र. ८०६ ते ८७४ आणि ८७६ ते ८९६ स्फुट श्लोकरचना आहे. क्र. ८७५ आणि क्र. ८९७ ते ९४५ सवाया आहेत. त्यांत क्र. ९४२ ह्या हिंदुस्थानी सवाया आहेत. नंतर पुन्हा एकदा क्र. ९४६ ते ९७६ स्फुट श्लोक आहेत. क्र. ९७७ एक सवाई आहे आणि अखेरी क्र. ९७८ ते ९८६ संस्कृत श्लोक आहेत. ह्या  संस्कृत श्लोकांची रचना रामदासांची नसावी आणि लेखन कल्याणस्वामींचे नसावें. क्र. ९७८ हा हरिकीर्तनाची महती सांगणारा श्लोक आहे, तर क्र. ९८१ व ९८२ हीं सुभाषितें दिसतात. क्र. ९८० व ९८३ हे काही शकुन सांगणारे श्लोक असावेत.

५) ओव्यांच्या आणि श्लोकांच्या गणनेत काही ठिकाणी गोंधळ झालेला दिसतो. उदाहरणार्थ, ओव्यांच्या चौदा शतांच्या अखेरी ओव्यांची संख्या १४०० दिली आहे, परंतु १४११ ओव्या आहेत. क्र. ४५४ हा तेरा श्लोकांचा गट दिसतो. परंतु अखेरच्या श्लोकाला क्र. १४ दिलेला आहे. पृ. ८१५ वरील अखेरच्या स्फुट श्लोकांचा क्र. १ आहे, पृ. ८१६ वरील पहिल्याच श्लोकाचा क्रमांक १ खोडून तीन केलेला दिसतो. त्यामुळे क्रमांक ८६८ हे ३ श्लोक म्हणजे ३ ते ६ असे चार श्लोक आहेत. पृ. ८५७ वरील अखरचा सवाईचा क्रमांक ४ आहे. आणि पृ. ८५८ वरील पहिल्या सवाईला पुन्हा क्रमांक ४ आहे. तो क्रमांक ५ हवा आहे असे वाटते.

पृ. ४९७ वर (क्र. ४०२ ह्या २० श्लोकांच्या गटात) वरच्या आणि तळच्या समासात एकेक श्लोक लिहिलेला असून त्यांना क्रमांक १६ व १७ दिलेले आहेत. हे श्लोक मूळच्या श्लोकाऐवजी वाचावे किंवा कसे हे समजले नाही.

६) अनेक श्लोकांचे आणि सवायांचे पुनर्लेखन झालेले आहे. काही ठिकाणी पुनर्लेखन झाल्याचे लक्षात आल्यावर काट मारलेली आहे. जसे पृ. ५३८ वर पृ. ५१४ वरील श्लोकांचे (क्र. ४१९ ) पुनर्लेखन असून त्यावर काट मारलेली आहे. पृ. ४२१ वरील समासात क्र. ३०६ ह्या ओव्यांचे पुनर्लेखन करून त्यावर काट मारलेली आहे.

७) शेवटची, ८७६ ते ९२४ पृष्ठें कोरी आहेत.

८) श्री. देवांच्या नोंदीप्रमाणे '' हे संबंध बाड सभेकडून छापले गेले आहे. हे संबंध बाड म्हणजे मालेंतील तीसरा भाग श्रीरामदासांची कविता, पाचवा भाग श्री. श्लोक मनाचे आणि दहावा श्रीकरूणाष्टकें.''